# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२४

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रात शिक्षण मंडळातील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(१) ३३५२५ (०१-०२-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रात शिक्षण मंडळातील गैरव्यवहाराची चौकशी करण्याचे आदेश प्रधान सचिव, नगरविकास यांनी आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांना सन २०१८-१९ मध्ये दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने आयुक्त उल्हासनगर यांनी शासनास अहवाल सादर केला आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालानुसार शिक्षण मंडळात किती रुपयांचा गैरव्यवहार झालेला आहे किवा अनियमितता झाल्याने संबंधित ठेकेदार व प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) सदर प्रकरणी दिनांक २०.११.२०१८ रोजीच्या पत्रास अनुसरुन "तपासून कार्यवाही करण्यात यावी", असे निर्देश आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांना देण्यात आले आहेत.

(२) सदर प्रकरणी उल्हासनगर महानगरपालिकेकडून अहवाल प्राप्त झाला आहे.

(३) उल्हासनगर महानगरपालिकेच्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना आयुक्तांच्या मंजुरीने शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले असून, तसेच शालेय साहित्य, गणवेश व इतर शैक्षणिक साहित्याचे वाटपामध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झाला नसल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेकडून प्राप्त अहवालात नमूद करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महाराष्ट्रातील नगरपरिषदकडे असलेल्या मोकळ्या जागा ठरावाद्वारे समाजसेवी संस्था, सहकारी संस्था व गृहनिर्माण संस्था यांना हस्तांतरित केल्याबाबत.

**(२) ४३३४२ (२७-०४-२०२२) श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील नगरपरिषदांकडे असलेली मोकळी जागा नगरपरिषदेने ठरावाद्वारे समाजसेवी संस्था, सहकारी संस्था व गृहनिर्माण संस्था यांना हस्तांतरीत केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या कारणासाठी किंवा उद्देशासाठी सदर मोकळी जागा हस्तांतरित केली गेली आहे, तो हेतू साध्य झाला आहे काय,

(३) नसल्यास, महाराष्ट्रातील नगरपरिषदांच्या अश्या हस्तांतरित मोकळ्या जागा परत नगरपालिकेकडे घेऊन त्यावरील अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०४-२०२४) :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय तो हेतू साध्य झाला आहे.

(३) सदर जागांवर अतिक्रमण झालेले  नसल्याने प्रश्न उद्भवत नाही.

(४)  प्रश्न उदध्वत नाही.

---

**महाराष्ट्रातील नगरपरिषद, नगरपंचायतीनी चतुर्थ वार्षिक कर आकारणी केली नसल्याबाबत**

**(३) ४७८०३ (२८-०९-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १२३ व कलम १२४ नुसार चतुर्थ वार्षिक कर आकारणी करणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत राज्यांमधील नगरपरिषद नगरपंचायतीने ही चतुर्थ वार्षिक कर आकारणी केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अधिनियमानुसार चतुर्थ वार्षिक कर आकारणी न केलेल्या नगरपरिषद व  नगरपंचायतांनी आकारणी न करण्यामागची कारणे काय आहेत , असल्यास, चतुर्थ वार्षिक कर आकारणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच राज्यातील संपूर्ण नगरपालिका आणि नगरपंचायतींचे कंत्राट सन २०१७-१८ दरम्यान S२ इन्फोटेक या एकाच कंपनीला चतुर्थ वार्षिक कर आकारणी मालमत्ता सर्वेक्षण करण्याची जबाबदारी दिली असून, या कंपनीच्या कामचुकारपणामुळे नगरपालिकांमधील चतुर्थ वार्षिक कर आकारणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी S२ इन्फोटेक कंपनीने सर्वेक्षणाचा डाटा नगरपालिकांना उपलब्ध न केल्याबाबत चतुर्थ वार्षिक कर आकारणी बाबतीत नगरपालिकांना कोणते निर्देश देण्याबाबत तसेच S२ इन्फोटेक कंपनीवर अवलंबून न राहता नगरपालिका आपले वैधानिक कर्तव्य पार पाडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०४-२०२४) :** (१)   हे खरे आहे.

(२)   अशंत: खरे आहे.

(३)   दोन वर्षाचा कोरोना काळ, अपुरे मनुष्यबळ, नव्याने स्थापन झालेल्या नगरपरिषद व नगरपंचायती या कारणाने काही नगरपरिषद व नगरपंचायतीमध्ये चतुर्थ वार्षिक कर प्रलंबित आहे. प्रलंबित चतुर्थ वार्षिक कर आकारणी करण्यासाठी नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी दि.०१.११.२०२२ च्या परिपत्रकामध्ये मार्गदर्शक सुचना दिलेल्या असुन चतुर्थ वार्षिक कर आकारणीची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४)   हे अशंत: खरे आहे.

राज्यातील सर्व नगरपरिषद / नगरपंचायतीच्या हद्दीतील मालमंत्ताचे जीआयएस आधारीत सर्वेक्षण व मॅपींग प्रकल्प राबविणेकरीता महाआयटी कॉर्पोरेशन यांनी निविदा प्रसिध्द करुन S-२ इन्फोटेक इंटरनॅशनल लि.यांची जीआयएस आधारीत सर्वेक्षण व मॅपींग प्रकल्प राबविणेसाठी  नेमणुक करण्यात केली होती. चतुर्थ कर आकारणी करण्यासाठी -२ इन्फोटेक इंटरनॅशनल लि.यांची नेमणुक करण्यात आलेली नाही.

(५) नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्या दि.०१.११.२०२२ च्या परिपत्रकान्वये खालील सुचना सर्व नगरपरिषद व नगरपंचायती यांना दिल्या आहेत.

१) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ मधील तरतुदींनुसार चतुर्थ वार्षिक कर आकारणी व पुर्ननिर्धारण संबंधित कार्यवाही ही नगरपरिषद व नगरपंचायत यांनी प्रचलित कायदे, नियमातील तरतुदी व स्थानिक परिस्थितीनुसार सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने करावी.  करनिर्धारण प्रक्रिया ही कोणत्याही कारणास्तव प्रलंबित राहणार नाही, याची दक्षता मुख्याधिकारी यांनी घ्यावी.

२) राज्यातील सर्व नगरपरिषदा व नगरपंचायती यांनी त्यांच्या हद्दीतील मालमत्तांचे जीआयएस आधारीत सर्वेक्षण व मॅपिंग करण्यासाठी नगर विकास विभागाने दिलेल्या दि.०३.११.२०१७ रोजीच्या शासन परित्रकाचे पालन करावे.
(६) प्रश्न उध्दवत नाही.

---

**चेंबूर (पश्चिम) येथील मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या शाखेच्या जागेचा ताबा मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याबाबत**

**(४) ४९६८४ (२७-०१-२०२३). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चेंबुर (पश्चिम) येथील मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या शाखेची जागा मुंबई महानगरपालिकेच्या चुकीच्या धोरणामुळे अजुनही ग्रंथसंग्रहालयाच्या ताब्यात मिळाली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी म्हाडाने इमारत क्र.१६८ए मधील जागा ही मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयासाठी आरक्षित असल्याची स्पष्ट भूमिका वारंवार घेतली असतानाही महानगरपालिका याकडे गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुर्नविकासानंतर सदर इमारतींत अन्य रहिवाशी वास्तव्यास आले असून, सदर जागेचे भाडेकरु असणाऱ्या ग्रंथसंग्रहालयाने त्यांच्या जागेसाठी मुंबई महानगरपालिका, म्हाडा मंडळाकडे सातत्याने पाठपुरावा देखील केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, १२५ वर्षांचा वारसा असलेल्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या चेंबूर (प.) शाखेची जागा तातडीने ग्रंथसंग्रहालयास उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) विकास नियंत्रण नियमावली-१९९१ अन्वये ग्रंथालयासाठी आरक्षित असलेली २१०७.६३ चौ. फुट ग्रंथालय सहाय्यक अभियंता (सुधार) यांचेकडून सहाय्यक अभियंता (परिरक्षण) यांनी दिनांक १५.१२.२०१५ रोजी ताब्यात घेतली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
म्हाडाने सदर जागेचा पुनर्विकास करताना तेथे सार्वजनिक ग्रंथालय / वाचनालयाचे आरक्षण असल्याने बांधीव सुविधा नियमानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत केली आहे व सदर बांधीव सुविधा मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयास द्यावी अशी लेखी / तोंडी विनंती मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे पदाधिकारी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे करीत आहेत.
(४) सदर इमारत क्र. १६८ए, चेंबूर (प.) ही जागा मुंबई मराठी संग्रहालयाची नसून सदर जागा बृहन्मुंबई महानगरपालिकेस विकास नियंत्रण नियमावली-१९९१ मधील तरतुदीनुसार समायोजन आरक्षणांतर्गत सार्वजनिक ग्रंथालय / वाचनालयासाठी प्राप्त झालेली आहे.
सदर जागेत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने तात्पुरत्या स्वरुपात विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुरु करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मालेगावातील (जि.नाशिक) बसस्थानकाजवळील उडडाणपुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(५) ५०२३० (१८-०१-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) बसस्थानकाजवळील वाहतूक समस्या सोडविण्याकरिता शासनाने महाराष्ट्र सुर्वण जयंती नगरोत्थान अभियांनातर्गत २१७२ कोटी इतका निधी उडडाणपुलाकरिता मंजूर करुन माहे ऑगस्ट,२०१७ मध्ये प्रत्यक्षात कामाला सुरुवात करुनही अदयाप काम प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोंबर,२०२२ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामाचा कार्यारंभ काढतांना २४ महिन्यांची मुदत देण्यात आली होती हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अत्यल्प मनुष्यबळ व आधुनिक मशिनरीचा अभाव असल्याने मागील पाच वर्षापासून सदर पुलाचे काम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने त्यानुसार यास जबाबदार असणा-या ठेकेदारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०४-२०२४) :** (१), (२), (३), (४) व (५) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत मालेगाव शहरात उड्डाण पुल उभारण्याच्या रुपये २१.७२ कोटी किंमतीच्या प्रकल्पास दिनांक २३ फेब्रुवारी, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

सदरील प्रकल्पाचे काम सुरु असताना कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे माहे एप्रिल, २०२० ते जुलै, २०२१ पर्यंत काम बंद असणे, वीज वितरण कंपनीकडून पुलाच्या कामात अडथळा ठरणारे विद्युत पोल व वाहिन्या स्थलांतरित करणेकरिता अतिशय कमी वेळेचा मिळणारा शट डाऊन, स्थानिक नागरिकांची पुलाच्या लांबीत वाढ करण्याची मागणी, सदर रस्त्यावर शहराचे मध्यवर्ती बस स्थानक असल्याने बस फेऱ्या अन्य बस स्थानकावर स्थलांतरित करणे अशा विविध कारणांमुळे कामास विलंब झालेला आहे.

सदर प्रकल्पाच्या कामास होत असलेल्या विलंबास अनुसरून मालेगाव महानगरपालिकेने संबंधित कंत्राटदाराकडून चौथ्या देयकामधून रुपये २५,०००/- इतका दंड वसूल केला आहे.

सद्यस्थितीस सदर प्रकल्पाचे काम ८८.४८ % पूर्ण झाले असून सदरील काम पूर्ण करून वापरासाठी खुला करण्याचे मालेगाव महानगरपालिकेचे नियोजन आहे.

---

### बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य प्रणाली अंतर्गत एनबीसी आणि युडीपीएफआयच्या नियमांनुसार ६५९ दवाखान्यांची कमतरता असल्याबाबत

**(६) ५१४३९ (२२-०१-२०२३). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य प्रणाली अंतर्गत एनबीसी आणि युडीपीएफआयच्या नियमांनुसार ६५९ दवाखान्यांची कमतरता असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मनपाचा एकही प्रशासकीय प्रभाग या आर्हतेची पुर्तता करत नसून, सदर नियमांनुसार शहराच्या २७% झोपडपट्टीतील लोकसंख्येसाठी १३३ दवाखान्यांची गरज आहे, पश्चिम उपनगरातील ४३% झोपडपट्टीतील लोकसंख्येसाठी ३१५ दवाखान्यांची गरज आहे तसेच पूर्व उपनगरातील ४३% झोपडपट्टीतील लोकसंख्येसाठी २११ दवाखान्यांची गरज आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, झोपडपट्टीत राहणारे लोकसंख्या जास्त असलेल्या भागात अपुऱ्या दवाखान्यांमुळे बाह्यरूग्ण विभागात नोंदवल्या जाणाऱ्या सरासरी केसेस या जास्त लोकसंख्येच्या तुलनेत कमी आहेत. परंतू दहिसर व बोरिवली भागातील मोठ्या प्रमाणात नागरिक झोपडपट्टीत राहतात त्याठिकाणी दवाखाने हे खूप कमी आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य प्रणालीअंतर्गत एनबीसी आणि युडीपीएफआयच्या नियमाचा अहवाल महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागास प्राप्त झाला नाही.
(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत २४ विभागांमध्ये एकूण १९० दवाखाने कार्यरत असून, हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे प्राथमिक आरोग्य सेवा सक्षमीकरण योजनेंतर्गत १३ पॉलिक्लिनिक आणि डायग्नोस्टीक केंद्र सुरु करण्यात आली आहेत. तसेच झोपडपट्टी व झोपडपट्टीसदृश विभागामध्ये दर २५,००० लोकसंख्येसाठी एक दवाखाना याप्रमाणे सद्य:स्थितीत ३९ एचबीटी क्लिनीक सुरु करण्यात आले आहेत व भविष्यात एकूण १५४ एचबीटी क्लिनिक सुरु करण्यात येणार आहेत.

दहिसर व बोरीवली येथे अनुक्रमे आर/उत्तर व आर/मध्य या विभागांमध्ये अनुक्रमे सात व आठ दवाखाने कार्यरत आहेत. तसेच आर/उत्तर विभागात १ एचबीटी क्लिनिक व १ पॉलिक्लिनिक आणि डायग्नोस्टिक केंद्र सुरु करण्यात आले आहे. आर/मध्य विभागात १ पॉलिक्लिनिक आणि डायग्नोस्टिक केंद्र व २ एचबीटी क्लिनिक्स सुरु करण्यात आलेली आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जोगेश्वरी - पूर्व (मुंबई) नटवरनगर येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेने धोकादायक ठरविलेल्या इमारतींच्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत

**(७) ५२१५९ (२७-०१-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरात पावसाळयात जुन्या इमारतींच्या अपघाताचे प्रमाण लक्षात घेता पावसाळयापूर्वी मुंबई शहर व उपनगरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून संरचनात्मक तपासणी करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जोगेश्वरी-पूर्व (मुंबई) येथील नटवरनगर रस्ता क्रमांक १ येथील सुलोचना निवास (रावते बिल्डिंग) ही इमारत बृहन्मुंबई महानगरपालिकेने केलेल्या संरचनात्मक तपासणीत धोकादायक असल्याचे निष्पन्न झाले असल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू इमारतीच्या मालकाच्या आडमुठे धोरणामुळे या इमारतीचा पुनर्विकास प्रकल्प प्रलंबित राहिल्यामुळे तसेच आर्थिक अडचणीमुळे इतरत्र भाडयाने राहण्याची पात्रता नसल्याने इमारतीमधील रहिवाशांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने सदरहू इमारतीचा मालक व रहिवाशी यांना एकत्र आणून सदरहू इमारतीच्या पुनर्विकासाचा प्रकल्प तातडीने सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) तसेच मुंबई शहर व उपनगरात बृहन्मुंबई महानगरपालिकेने धोकादायक ठरविलेल्या तथापि इमारत मालकांच्या चुकीच्या धोरणामुळे पुनर्विकास प्रलंबित असलेल्या इमारतींची संख्या व तपशील काय आहे व सदरहू इमारतींचा तातडीने पुनर्विकास सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील एमएमआरडीए, मुंबई पोर्ट ट्रस्ट, एमआयडीसी, केंद्र शासन, रेल्वे, एस.आर.ए., म्हाडा यांचे परिक्षेत्र वगळून महानगरपालिका कार्यक्षेत्रात येणाऱ्या जागेवरच्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारतींची संरचनात्मक तपासणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येते व खाजगी इमारतींची संरचनात्मक तपासणी करण्यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५३बी अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नोटीसा बजावण्यात येतात.
(२) सुलोचना निवास (रावते बिल्डिंग) ही इमारत सन २०१६ मध्ये धोकादायक इमारत म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात आली होती.
(३) सदर इमारतीबाबतच्या पुनर्विकासाबाबतचा प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेला नाही.
(४) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात धोकादायक असलेल्या इमारतींचा पुनर्विकास करणे शक्य होण्याकरिता व सदर पुनर्विकासास चालना देऊन ते जलदगतीने पूर्ण होण्याकरिता बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मध्ये विनियम ३३(७), ३३(७)(अ), ३३(७)(ब) यांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. सदर विनियमामध्ये प्रोत्साहन चटईक्षेत्र निर्देशांक देण्याची तरतूद आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेस असे प्रस्ताव नियुक्त वास्तुविशारद / परवानाधारक सर्वेक्षक यांचेमार्फत मालक / गृहनिर्माण संस्था यांचेकडून प्राप्त झाल्यानंतर बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४, मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ च्या कलमांच्या अनुषंगाने मंजुरी देण्याचे काम करण्यात येते.
(५) बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील विनियम क्र. ३३(७) मधील अनु. क्र. १७ नुसार इमारत मालकाने धोकादायक इमारत तोडल्यानंतर इमारत पुनर्विकासाचे काम एक वर्षाच्या आत सुरु करुन ते पाच वर्षांत पूर्ण करणे बंधनकारक आहे.

तसेच बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मध्ये विनियम ३३(७), ३३(७)(अ), ३३(७)(ब) नुसार पुनर्विकासाचा कोणताही प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेत प्रलंबित नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक इमारतींच्या यादीतील एकूण ३३२ इमारतींपैकी ६१ इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेतील प्रकल्प बाधितांच्या सदनिका निविदा प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(८) ५२४८३ (२७-०१-२०२३). श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या नाला रुंदीकरण, रस्ते प्रकल्प, नद्यांचे पुनजीर्वित करणे आदी विविध प्रकल्पात कुटुंबे बाधित होत असल्याने त्यांना विनामुल्य घरे देणे नियमानुसार बंधनकारक असून मुंबई महानगरपालिकेसह विविध प्राधिकरणाच्या माध्यमातून ३०० हून अधिक प्रकल्प राबविण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रकल्प बाधितांसाठी मुंबई महानगरपालिकेकडून खाजगी जागावर बांधण्यात येणाऱ्या सदनिका निविदा प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याचा आरोप मुंबई महानगरपालिकेतील माजी विरोधी पक्षनेता यांनी केला असल्याचे दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात रस्ते रुंदीकरणाच्या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांना उपलब्धतेनुसार पर्यायी जागा देण्यात येतात.

(२) व (३) सदर प्रकरणी महानगरपालिका विरोधी पक्षनेता यांनी त्यांच्या दिनांक १९ मे, २०२२ रोजीच्या पत्रान्वये मा. लोक आयुक्त यांच्याकडे तसेच पत्रकार परिषद घेऊन कथित अनियमिततेबाबत तक्रार केली होती.

त्याअनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक २१ मे, २०२२ रोजीच्या टाईम्स ऑफ इंडिया, लोकसत्ता व महाराष्ट्र टाईम्स या स्थानिक वृत्तपत्रांत सदर बाबतीत कोणतीही अनियमितता झाली नसल्याबाबत जाहीर खुलासा करण्यात आलेला आहे. तसेच महानगरपलिका विरोधी पक्षनेता यांना दिनांक १३ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये तसे अवगत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील मालाड येथे एक हजार वृक्षांची तोड केल्याबाबत

**(९) ५३४५६ (२७-०१-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड येथे एक हजार वृक्षांची तोड झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिकांनी तक्रार केल्यावर पालिका प्रशासनाने पोलिसांकडे तक्रार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने बेकायदा वृक्षतोड करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) दिनांक २९ जून, २०२२ रोजी स्थानिक नागरिकांकडून प्राप्त तक्रारीन्वये सर्व्हे क्र. २३९, आयटी पार्क, नागरी निवारा परिषद, दिंडोशी, मालाड (पूर्व) येथे पाहणीदरम्यान कापलेल्या ५६० झाडांचे बुंधे आढळून आले.

(२) हे खरे आहे.

(३) स्थानिक नागरिकांकडून तक्रार प्राप्त झाल्यानंतर दिंडोशी पोलीस ठाणे येथे जागामालक व विकासक यांचेविरुध्द दिनांक २०.०९.२०२२ रोजी महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण व जतन अधिनियम १९७५, कलम ८ सह २१ अन्वये अदखलपात्र गुन्हा क्रमांक २३२७ नोंदविण्यात आला आहे. तद्नंतर दिंडोशी पोलीस ठाणे यांचेमार्फत दिनांक ०७.११.२०२२ रोजी प्रथम खबर क्र. ११०० अन्वये प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चर्चगेट (मुंबई) येथील फॅशन स्ट्रीटवरील दुकानांना लागलेली आग

**(१०) ५४२३४ (२२-०१-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चर्चगेट येथील फॅशन स्ट्रीटवरील दुकानांना लागलेल्या आगीत २० दुकाने जळून खाक झाली असल्याची घटना दिनांक ५ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी लागलेल्या आगीमुळे दुकानदारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुसार मुंबईतील

अशाप्रकारे आग लागण्याच्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) व (२) दिनांक ०५.११.२०२२ रोजी चर्चगेट येथील फॅशन स्ट्रीटवरील दुकानांना लागलेल्या आगीत एकूण २३ दुकाने जळाली होती.
(३) सदर आगीची बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली असून, सदर आग लागण्याचे संभाव्य कारण "सदोष विद्युत प्रणाली" असे आढळून आले.
मुंबईतील अशा प्रकारे आग लागण्याच्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मुंबईतील जनतेमध्ये अग्निसुरक्षेबाबत जनजागृती, अग्निशमन व विमोचनाचे प्राथमिक ज्ञान याबाबतचे प्रशिक्षण व उपक्रम इत्यादी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत राबविले जातात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केंद्र शासनाने शिवाजीनगर (पुणे) येथील आकाशवाणीचे केंद्र पुणे शहरातून अन्यत्र ठिकाणी स्थालंतरीत करण्याबाबत

**(११) ५७२९४ (२६-०४-२०२३). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवाजीनगर (पुणे) येथील आकाशवाणीचे केंद्र पुणे शहरातून अन्य ठिकाणी स्थलांतर करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही दिवसांपूर्वीच या केंद्राच्या परिसराची मोजणी करण्यात आली असून सदर जागेचा वापर उत्पन्न मिळण्यासाठी करण्यात येणार असल्यामुळे तेथील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या शिफ्ट डयुटी कमी करण्यात येऊन पुणे केंद्राच्या दोन शिफ्ट आणि विविधभारतीची दुपारची शिफ्ट रद्द करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या सेवेचा विस्तार करण्याऐवजी कार्यक्रमांना कात्री लावणे, पुरेसा निधी न पुरविता उलटपक्षी संस्थेने स्वत:च उत्पन्न मिळविण्याचे आदेशित करणे, कर्मचारी संख्या कमी करणे, तसेच याबाबत तेथील संबंधितांनी वरिष्ठांकडे दाद मागूनही त्याची दखल घेण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी अनेक खाजगी रेडिओ सेवा सुरु झाल्या असल्या तरी खेडोपाडयातील लाखो श्रोत्यांमध्ये आकाशवाणीची असलेली लोकप्रियता लक्षात घेता शिवाजीनगर,पुणे येथील आकाशवाणी केंद्र पुणे शहरातून अन्यत्र न हलविण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे त्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) नाही. शिवाजीनगर पुणे येथील आकाशवाणीच्या केंद्राच्या परिसराची मोजणी मेट्रोच्या कामासाठी करण्यात आलेली आहे.
(३) हे खरे नाही. आकाशवाणी, पुणे हे केंद्र शासनाचा उपक्रम आहे. यास्तव ते झोनल ऑफिस (वेस्ट झोन) आकाशवाणी महानिदेशालय/प्रसार भारती सचिवालय यांच्या निर्देशांचे पालन करते.
(४) अशी कार्यवाही केलेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात वाहनांना एआयएस प्रमाणित परावर्तक (रिफ्लेक्टर) लावणे बंधनकारक करणेबाबत**

**(१२) ५८४२२ (२८-०४-२०२३). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारच्या आदेशानंतर आता राज्यात वाहनांना एआयएस प्रमाणित परावर्तक (रिफ्लेक्टर) लावणे बंधनकारक असतानाही अवजड, मालवाहतूक आणि प्रवासी वाहतूक करणा-या खाजगी बसवर एआयएस प्रमाणित रिफ्लेक्टर लावण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात वाहनांवर निकृष्ट दर्जाच्या रिफ्लेक्टरचा वापर केला जात असून पहाटे आणि रात्रीच्या धुक्यामध्ये वाहनांवरील रिफ्लेक्टर परावर्तित होत नसल्याने अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी प्रभावी अंमलबजावणी करून एआयएस प्रमाणित रिफ्लेक्टर लावण्याबाबत शासन वाहनांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०३-२०२४) :** (१) होय.

(२) केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम १०४ ते १०४-ई मधील तरतुदीनुसार AIS ०८९ व AIS ०९० मानकांची पूर्तता करणारे मान्यता प्राप्त परावर्तक (Reflectors), रिफ्लेक्टीव्ह टेप्स (Reflective Tapes) आणि मागील बाजूस रियर मार्किंग प्लेट/टेप बसविणे बंधनकारक असून रिफ्लेक्टर न लावणाऱ्या अथवा बनावट रिफ्लेक्टर लावणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन कायदा व त्या अंतर्गत असलेल्या नियमानुसार कारवाई करण्याच्या सूचना वेळोवळी सर्व प्रादेशिक/ उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) केंद्र शासन अधिसूचना क्रमांक ४८४(ई) दि.१२.११.२००८ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार तसेच केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम १०४ ते १०४-ई मधील तरतुदीनुसार AIS ०८९ व AIS ०९० मानकांची पूर्तता करणारे मान्यता प्राप्त परावर्तक (Reflectors), रिफ्लेक्टीव्ह टेप्स (Reflective Tapes) आणि मागील बाजूस रियर मार्किंग प्लेट/टेप बसविण्याबाबत ज्या वाहनांकरीता तरतुद लागू आहे, त्या वाहनांना नियमातील तरतुदीप्रमाणे बसविण्याची कार्यवाही करण्याबाबत सर्व प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाना सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील देवनार व चेंबूर परिसरातील नागरीक प्रदूषणामुळे त्रस्त झाल्याबाबत**

**(१३) ५९९२३ (२६-०४-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील देवनार कचरा डेपो आणि चेंबूर परिसरातील तेल, खत कंपन्यांमुळे मागील अनेक वर्षापासून चेंबूर-गोवंडीतील प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनधिकृत सिमेंट रेडिमिक्स प्रकल्पामुळे प्रदूषणात मोठी भर पडली असून वातावरणात सिमेंटचे धूलिकण पसरत असल्यामुळे या परिसरातील नागरीकांना श्वसन व डोळयांच्या विकारांचे आजार होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सदर प्रदुषणकारी प्रकल्प शहराबाहेर स्थलांतरित करण्यात यावा अशी मागणी स्थानिक नागरीकांकडून होत आहे, हे ही खरे आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार सदर प्रकल्प शहराबाहेर स्थलांतरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०३-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.
बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दि २०.१२.२०२२ रोजी प्राप्त अहवालाव्दारे एम. पुर्व, चेंबुर विभागातील महापालिकेच्या ५ दवाखान्यातील रुग्णांचा गेल्या तीन वर्षातील अहवालावरुन उपरोक्त दवाखान्यात उपचार घेतलेल्या रुग्णांच्या संख्येत लक्षणीय वाढ होऊन आरोग्यावर विपरीत परिणाम होत नसल्याचे कळविले आहे.
बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दि. २४.०२.२०२३ रोजीच्या अहवालानुसार मागील ३ वर्षाचा या परिसरातील नागरिकांना श्वसन व डोळयांच्या विंकारांचा आजारात वाढ होत नसल्याचे नमुद केले आहे.
(३) व (४) मागील एक वर्षाच्या कालावधीमध्ये एकूण ७ आर.एम.सी. उद्योगांना कारणे दाखवा नोटीस, ७ प्रस्ताविति निर्देश, ८ अंतरीम निर्देश, ५ उद्योग बंद चे आदेश, ३ उद्योग सशर्त चालु करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वणी (जि.यवतमाळ ) येथील परिसरामध्ये कोळश्याच्या वाहतुकीने धुळ प्रदुषणाचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(१४) ६००३६ (२४-०४-२०२३). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वणी (जि.यवतमाळ) येथील परीसरामध्ये ११ कोळसा खाणीत कोळश्याचे उत्पादनाची दररोज मोठया प्रमाणात वाहतुक सुरु असून मालधक्का परीसरामध्ये शेकडो ट्रकच्या माध्यमातुन खाणीतील कोळसा आणला जात असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परीसरामध्ये मोठया प्रमाणात मानवी वसाहती असून त्या ठिकाणी धुळीचे प्रचंड प्रमाणात प्रदूषण होत असल्याने सुक्ष्मधुलीकणाचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हवेमध्ये सर्वसाधारणपणे धुलीकणाचे प्रमाण ५२ ते ८० पर्यंत असावे लागते परंतु या परीसरामध्ये कोळसा उद्योग असल्याने २०० पेक्षा अधिक धुलीकणाचे प्रमाण आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त परिसरात धुळ प्रदुषण मोठया प्रमाणात होत असल्याने प्रदूषण नियंत्रण महामंडळातंर्गत कोणत्याही प्रकारचे नियंत्रण ठेवले जात नसून संबंधित अधिकारी सुध्दा याकडे दुर्लक्ष करत असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त परिक्षण अहवालानुसार सर्वाधिक धुळीचे प्रदुषण मालधक्का परिसरात असल्याने तेथील नागरिकांनी वारंवार तक्रार करुनही कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार सदर परीसरातील धुळ प्रदुषण कमी करण्याबाबत विभागाला सुचना देण्यात येवून प्रदूषण मुक्त होण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०३-२०२४) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.
यवतमाळ जिल्ह्यातील वणी तालुक्यात वेस्टर्न कोलफिल्ड लि. ने वणी क्षेत्र व वणी नॉर्थ क्षेत्र अशी दोन क्षेत्रात विभागणी केली आहे. वणी क्षेत्रात ५ व वणी नार्थ क्षेत्रात ७ कोळसाखाणी आहेत. यवतमाळ जिल्ह्यात वेस्टर्न कोलफिल्ड लि. च्या एकूण १२ व २ खाजगी कोळसा खाणी आहेत. त्यापैकी १२ खुल्या व २ भूमिगत खाणी आहेत. वणी व वणी उत्तर क्षेत्रामध्ये कोळसा वाहतुकीसाठी वेस्टर्न कोलफिल्ड ली. च्या वणी सायडींग (वणी रेल्वे स्थानक), राजुर सायडींग या दोन रेल्वे सायडींग कार्यरत आहेत.

वणी शहरातील तहसिल कार्यालयात वातावरणीय हवा गुणवत्ता सनियंत्रण यंत्र बसविलेले आहे व त्याद्वारे नियमितपणे वातावरणीय हवेचे नमूने गोळा करण्यात येतात. वातावरणीय हवेची गुणवत्ता तपासली असता वातावरणातील धुलीकणांचे प्रमाण विहीत मर्यादे (१०० μg/Nm३) पेक्षा जास्त असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

राष्ट्रीय वातावरणीय हवा गुणवत्ता मानकांची मर्यादा यादीनूसार वातावरणीय हवेतील धुलीकण (PM१०) ची मर्यादा १०० μg/Nm३ इतकी आहे. पृथ:करण अहवाल पाहता धुलीकणांचे प्रमाण (PM१०) मर्यादेपेक्षा अधिक आढळते.

धुलीकणांचे नियंत्रण करण्याकरिता वेस्टर्न कोलफिल्ड लि. द्वारे वेळोवेळी पाण्याची फवारणी करण्यात येते.

(५) वणी परिसरातील वणी रेल्वे स्टेशन येथील रेल्वे सायडींगमुळे होणाऱ्या वायु प्रदूषणाबाबत या कार्यालयास तक्रार प्राप्त झाली होती. तक्रारीच्या अनुषंगाने वणी रेल्वे स्थानकास दि. २६/०५/२०२२ रोजी खबरदारीची नोटीस, दि. १६/०६/२०२२ रोजी कारणे दाखवा नोटीस व दि. ०६/०७/२०२२ रोजी प्रस्तावित निर्देश बजाविण्यात आलेले आहेत व पुढील कार्यवाहीकरिताचा प्रस्ताव मुख्यालय, मुंबई येथे सादर करण्यात आला आहे.

(६) या रेल्वे सायडींगवर वेर्स्टन कोलफिल्ड लि. तथा रेल्वेकडून टँकरद्वारे पाणी फवारणी केली जाते. या रेल्वे सायडींगला महाराष्ट्र प्रदूषण नियत्रण मंडळातर्फे वेळोवेळी भेट देऊन पाहणी करण्यात येते व पाहणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

---

**नगरपालिका, नगरपरिषदेमध्ये रेखांकन, बांधकाम परवाना, गुंठेवारी, भूखंड एकत्रीकरण याबाबत लेखापरीक्षण करणेबाबत**

**(१५) ६१२४४ (२४-०४-२०२३). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरपरिषदामध्ये स्थानिक स्तर लेखापरीक्षक यांच्याकडून प्रत्येक वर्षी लेखापरीक्षण होत असून सदर लेखापरीक्षणामध्ये रेखांकन, बांधकाम परवाना, गुंठेवारी, भूखंड एकत्रीकरण याबाबत लेखापरीक्षण होत नाही. परिणामी नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारीच्या अनुषंगाने चुकीच्या बाबी निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेखांकन, बांधकाम परवाना, गुंठेवारी, भूखंड एकत्रीकरण याबाबत प्रत्येक वर्षी लेखापरीक्षण न झाल्याने नगरपरिषदने केलेली कार्यवाही बरोबर आहे की चूक आहे हे लक्षात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तसेच अंकुश ठेवून पुढील काळात नगरपालिका, नगरपरिषदेमध्ये रेखांकन, बांधकाम परवाना, गुंठेवारी, भूखंड एकत्रीकरण याबाबत लेखापरीक्षण करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०४-२०२४) :** (१) हे खरे नाही.

राज्यातील नगरपरिषदामध्ये मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० नुसार नगरपरिषदेच्या जमा व खर्चाच्या लेख्यांचे लेखापरिक्षण केले जाते. त्यामध्ये रेखांकन,बांधकाम परवाना, गुंठेवारी, भूखंड एकत्रीकरण याबाबत लेखापरीक्षण करण्यात येते. नगरपरिषदेने रेखांकन,बांधकाम परवाना,गुंठेवारी,भूखंड एकत्रीकरण या अंतर्गत केलेली कार्यवाही बरोबर आहे की चूक आहे हे लेखापरिक्षण दरम्यान निदर्शनास येते. त्यानुसार चुकीच्या बाबी निदर्शनास आल्यास नियमानुसार स्थानिक निधी लेखापरिक्षा यांचेव्दारे लेखापरिक्षण अहवालानुसार कार्यवाही केली जाते.

(२) हे खरे नाही.

प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये नगरपरिषदेमध्ये लेखा परिक्षण करण्यात येते.

(३) प्रश्न उध्दवत नाही.

(४) प्रश्न उध्दवत नाही.

---

## गोवंडीतील एस.एम.एस कंपनीच्या जैववैद्यकीय कचऱ्यामुळे होणाऱ्या प्रदुषणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(१६) ६४५३७ (०७-०६-२०२३). श्री.आदित्य ठाकरे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द-शिवाजी नगर (मुंबई) येथील SMS Envoclean Pvt. Ltd. ही कंपनी बायोमेडीकल वेस्ट मेडीसीन, ऑपरेशन साहित्य, ऑपरेशन मानवी अंग, नवजात मृत बालक अश्या कित्येक घातक वस्तु सदरहू ठिकाणी नष्ट करीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदरहू कंपनीच्या चिमणीद्वारे निघणाऱ्या धूरामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्यामुळे सदर परिसरामध्ये वर्षापासून वारंवार क्षय रुग्ण आणि दम्याचे रुग्ण वाढत असुन एम-पूर्व वॉर्ड मध्ये सन २०१३ ते मे, २०२२ पर्यंत क्षय रोगाच्या एकूण ४५ हजार, ५१ रुग्णांची नोंद झाली असुन १ हजार ८७७ रुग्णांचा मृत्यु झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एस.एम.एस कंपनीकडून होणाऱ्या प्रदुषणामुळे कंपनी कार्यवाही करण्याबाबत मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र प्रदूषण महामंडळ आणि केंद्रीय प्रदूषण महामंडळ यांच्याकडे तक्रार करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कंपनीला तत्कालीन सरकारने स्थलांतरीत करण्याचे आदेश देण्यात आले असताना सदर कंपनीने खालापुर तालुक्यामध्ये स्थालांतरीत करण्याचे आश्वासन शासनास दिले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने तक्रारींबाबत कार्यवाही न करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करुन नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने घातक असलेल्या एस.एम.एस कंपनीने अन्य जागेवर स्थालांतरीत होण्याबाबत शासनास दिलेल्या आश्वासनाप्रमाणे कोणती कार्यवाही केली कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०३-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

या उद्योगांमध्ये केवळ बायो मेडीकल वेस्टची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यात येते. नवजात मृत बालक अथवा वेस्ट मेडीसीनची विल्हेवाट सदर ठिकाणी करण्यात येत नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) हे खरे आहे.

तसेच, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे दाखल केलेल्या जनहित याचिका क्र. (L) No. ३३८८४ of २०२२ with Interim Application (L) No. ४४४१ of २०२३ नुसार दि. ११/०९/२०२३ रोजी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी अंतीम निकाल दिला असून त्यानुसार पुढील दोन वर्षात नवीन प्रकल्प रायगड जिल्ह्यातील पातळगंगा येथे कार्यान्वित होईल.

सदर सुविधा केंद्रास प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून केलेल्या पहाणी दरम्यान आढळुन आलेल्या त्रूटीनुसार बँक हमी रु. १ लाख व रु. २ लाख जप्त करण्याची कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे स्थलांतराबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उध्दभवत नाही.

---

## महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून राज्यातील प्रदूषण नियंत्रणासाठी सर्व ऊर्जा प्रकल्पांचे लेखापरिक्षण करण्याबाबत

**(१७) ६४५४१ (०७-०६-२०२३). श्री.आदित्य ठाकरे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने मा.पंतप्रधान यांनी सन २०२१ मध्ये ग्लासगो येथे झालेल्या कॉन्फरन्स ऑफ पार्टीज (COP२६) मध्ये सन २०७० पर्यंत निव्वळ-शून्य उत्सर्जन करण्याच्या घेतलेल्या निर्णयाच्या दृष्टीने राज्यातील प्रदूषण नियंत्रणासाठी सर्व ऊर्जा प्रकल्पांचे लेखापरिक्षण (ऑडिट) करण्याची घोषणा केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाकडून अद्याप पर्यंत किती ऊर्जा प्रकल्पांचे ऑडीट करण्यात आले आहे, तसेच चंद्रपूर, कोराडी, खापरखेडा, नाशिक, परळी, भुसावळ आणि पारस यांसारख्या सरकारी मालकीच्या औष्णिक वीज प्रकल्पांसाठी शमन कृती योजना राबविण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाकडून खाजगी ऊर्जा प्रकल्पांबाबत ऑडीट करण्यात येणार आहे काय तसेच राज्यात कोळशाच्या वापराच्या तुलनेत महाराष्ट्रात अक्षय ऊर्जा निर्मिती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली जाते व कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अक्षय ऊर्जा निर्मितीचा जास्त वापर करुन सन २०७० पर्यंत निव्वळ-शून्य उत्सर्जन करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही

---

## महाराष्ट्रातील वीज प्रकल्पातील फ्लाय ॲशमुळे होणाऱ्या प्रदुषणाला आळा घालण्यासाठी धोरण निश्चित करण्याबाबत

**(१८) ६४५४९ (०७-०६-२०२३). श्री.आदित्य ठाकरे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याला एकूण आवश्यक असलेल्या विजेपैकी ७१ टक्के वीज ही १९ औष्णिक केंद्रातून कोळशाच्या वापरातून निर्माण केली जात असून त्यातून वापरण्यात येणाऱ्या कोळशाच्या वापरापैकी ४० टक्के राख निर्माण होत असून पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी फ्लाय ॲशच्या वापरासाठी स्वतंत्र धोरण स्वीकारण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात वॉश केलेला कोळश्यामधून वीज निर्मितीमध्ये वाढ होत असल्याचे सांगून कोळ वॉशरीच्या कारखान्यांना शासनाने मान्यता देण्यात आली आहे काय, तसेच खापरखेडा औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र निर्मिती मध्ये सन २०१९-२० या वर्षात साधा कोळसा वापरुन करण्यात आलेल्या वीज निर्मिती पेक्षा कमी वीज सन २०२०-२१ च्या वॉश केलेल्या कोळशाच्या माध्यमातून झाली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, कन्हान नदीमध्ये खापरखेडा औष्णिक वीज निर्मिती केंद्राच्या मधून पाणी मिश्रित फ्लाय ॲश सोडण्यात आल्याने त्यांच्या फ्लाय ॲशमुळे जलशुध्दीकरण केंद्रातील पंप बंद करण्याची घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, औष्णिक केंद्राच्या फ्लाय ॲशमुळे होणाऱ्या प्रदुषणामुळे शेतीवर परिणाम होत असून होणाऱ्या प्रदुषणामुळे शेतीच्या उत्पन्नावर देखील परिणाम झाला आहे काय, प्रकल्पामध्ये जमीन संपादित केलेल्या तसेच फ्लाय ॲशच्या प्रदुषणामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी कोणती तरतुद करण्यात आली, अद्यापपर्यंत किती शेतकऱ्यांना मदत देण्यात आली आहे,

(५) असल्यास, सदर प्रकरणी औष्णिक केंद्राच्या फ्लाय ॲशमुळे होणाऱ्या प्रदुषणाला आळा घालण्यासाठी तसेच राख तलावांच्या जागेचा उपायोग करण्यासाठी त्या जागेवर सौर उर्जा प्रकल्प राबविण्याबाबत शासन विचार करेल काय तसेच औष्णिक केंद्राच्या वीज प्रकल्पातुन नदीपात्रात सोडण्यात येणाऱ्या फ्लाय ॲशमुळे होणाऱ्या प्रदुषणाची चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने केंद्र सरकारच्या धोरणानुसार दंडात्मक कारवाई करुन होणाऱ्या प्रदुषणाला आळा घालण्यासाठी कोणती उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०३-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

कोल वॉशरीच्या कारखान्याना शासनाने मान्यता दिली नसून कोळसा वॉश (धुण्यास) मान्यता दिली आहे.
हे खरे नाही.

सन २०१९-२० मध्ये खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात ७२६०.५३ दशलक्ष यूनिट विजनिर्मिती झाली. तसेच सन २०२०-२१ मध्ये ७९३०.८४ दशलक्ष यूनिट विजनिर्मिती झाली. ह्यावरून २०१९-२० च्या तुलनेत सन २०२०-२१ या काळात खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात विद्युत निर्मिती जास्त झालेली आहे, हे स्पष्ट होते.
(३) हे खरे आहे.
(४) औष्णिक केंद्राच्या प्लाय ॲशमुळे होणाऱ्या प्रदुषणामुळे शेतीवर परिणाम होत असल्याबाबतची तक्रार या कार्यालयात दि. २३/०१/२०२३ रोजी सुराबर्डी गावातल्या शेतकऱ्याची तक्रार प्राप्त झाली होती व महीला बचत गट चिचोरी यांच्या कडुन प्राप्त तक्रार दि. १७/०२/२०२३ तसेच दि. ०५/०३/२०२३ रोजी दैनिक इग्रजी वृत्तपत्रामध्ये सुध्दा बातमी प्रसारीत झाली होती. त्याअनुषंगाने उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-१ यांच्यामार्फत दि. २३/०३/२०२३ रोजी समजपत्र देण्यात आले होते.

जिल्हा कृषी अधिक्षक, कृषी अधिकारी, नागपूर यांच्याकडुन दि. १०/०७/२०२३ रोजी च्या प्राप्त अहवालानुसार ११ शेतकऱ्याची ६ हेक्टर ऐवढी शेती बांधीत झाले असल्याचे दि. ०२/०३/२०२२ च्या सर्वेक्षणात आढळले आहे.
(५) तलावांच्या जागेचा उपायोग करण्यासाठी त्या जागेवर सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्याबाबत कुठलाही प्रस्ताव महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झालेला नाही.

वृत्तपत्रात प्रसारीत झालेल्या व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने पाहणी करुन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे दि. ०९/११/२०२१ रोजी कारणे दाखवा नोटीस व दि. १५/०७/२०२२ रोजी प्रस्तावित निर्देश देण्यात आले आहे. तसेच संमतीपत्राच्या व पर्यावरण परवान्याच्या (E.C.) अटी व शर्तीचे, जल व हवा यांचे संकलीत केलेल्या नमुन्याचे प्रमाण विहित मर्यादेपेक्षा जास्त आढळुन आल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि. १७/०३/२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली असुन त्यामध्ये नमुद केल्यानुसार रु. ५०.०० लक्षाची बॅक हमी दि. ०८/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये जप्त करण्यात आलेली आहे. तसेच वारेगाव राख साठवणुक तलावातुन जुनी साठवून ठेवलेली राख शास्त्रोक्तपध्दतीने विल्हेवाट लावण्याकरीता दि. २६/०७/२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील नायर रुग्णालयात शिकणाऱ्या विदयार्थीकरीता हाजीअल्ली येथील मैदानाची जागा घेण्याबाबत

**(१९) ६४९४३ (२५-०८-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नायर रुग्णालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्याकरीता असलेल्या हाजीअली येथील मैदानाची जागा घेण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मैदानाचे जागेवर महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांसाठी क्लब हाऊस बांधण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत त्या अनुषंगाने क्लब हाऊस न बांधता तेथे मैदानच ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) व (२) हाजीअली येथील सी.एस. क्र. ४७/९ (भाग) या २४,३३८.११ चौ.मी क्षेत्रफळाच्या भूखंडापैकी ६६५६.११ चौ.मी. भूखंडावर वसतीगृह असून उर्वरित १९,६५१.०७ चौ.मी. भूखंडावर खेळाचे मैदान आहे.

सदर १९,६५१.०७ चौ.मी. खेळाच्या मैदानापैकी ११,४७२.८५ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड विभाजीत करुन, दिनांक ३१.०७.२०१७ रोजीच्या ठरावान्वये क्लब व जिमखानाकरिता आरक्षित करण्यात आला. त्यानुसार शासनाच्या दिनांक १७.०९.२०१९ च्या अधिसूचनेन्वये सदर ११,४७२.८५ चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडावरील मैदानाचे नामनिर्देशन बदलून क्लब व जिमखाना असे आरक्षण करण्यात आले.

त्यानुसार क्लब व जिमखाना याकरिताचे आराखडे तयार करण्यात आले असून, त्यास दिनांक ११.०६.२०२१ रोजी सागरी किनारा नियंत्रण प्राधिकरण (सी.आर.झेड) ची मान्यता प्राप्त झाली आहे.

सद्य:स्थितीत ऑनलाईन प्रणालीद्वारे सादर केलेल्या प्रस्तावावर प्रदान केलेल्या अभिप्रायानुसार सदर प्रस्ताव सी.आर.झेडच्या सुधारीत नियमावलीनुसार पुन:र्फेर तपासणीकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान कक्ष विभागाकडे प्रलंबित आहे.

तसेच, सदर प्रस्तावित इमारतीच्या आराखडे मंजुरीकरिता लागणाऱ्या विविध सवलतींचा प्रस्ताव मंजुरीसाठी प्रगतीपथावर आहे.
(३) व (४) राष्ट्रीय वैद्यकीय आयोग (एन.एम.सी.) यांच्या निकषानुसार वैद्यकीय विद्यार्थ्यांकरिता खेळाचे मैदान असणे आवश्यक आहे. तथापि सदर निकषांमध्ये मैदानाच्या क्षेत्रफळाचा उल्लेख नाही.

सद्य:स्थितीत नायर धर्मादाय रुग्णालयामध्ये शिकणाऱ्या वैद्यकीय विद्यार्थ्यांकरिता हाजीअली येथे ८१७८.०० चौ.मी. क्षेत्रफळाचे खेळाचे मैदान उपलब्ध आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोरेगांव (मुंबई) येथील पश्चिम द्रुतगती मार्गालगत असलेल्या सर्वोदयनगरमधील नागरिकांचे तसेच दुधसागर वसाहतीसमोरील खाजगी ट्रॅव्हल्स एजन्सीच्या दुकानांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(२०) ६५६०३ (२३-०८-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोरेगांव (मुंबई) येथील पश्चिम द्रुतगती मार्गालगत असलेल्या सर्वोदयनगरमधील नागरिकांचे तसेच दुधसागर वसाहतीसमोरील खाजगी ट्रॅव्हल्स एजन्सीच्या दुकानांचे पुनर्वसन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त द्रुतगती महामार्गालगतचा १८.३० मी रुंदीच्या विकास नियोजित रस्त्याचे सर्वेक्षण करुन सीमांकन महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सर्वोदयनगर दुधसागर वसाहतीसमोरील नागरिकांचे तसेच दुकानांचे पुनर्वसन करुन रस्त्याचा विकास करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पी/दक्षिण विभागाच्या विकास नियोजन-२०३४ च्या आराखड्यानुसार १८.३० मी. रुंदीच्या विकास नियोजन रस्त्याने बाधीत भूखंडाचे सी.टी.एस.क्र. ५८८, पहाडी गोरेगांव (पूर्व) व सी.टी.एस. क्र. ८१ दिंडोशी आहेत. सदर भूभाग बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात नाहीत. सदरचा विकास नियोजन रस्त्याने बाधीत भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेस अतिक्रमण विरहीत हस्तांतरीत करुन देण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्धवसाहत व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेशी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पत्रव्यवहार करण्यात आला आहे.
(२) सदर रस्त्याचे सर्वेक्षण झाले असून, सीमांकन करण्याकरिता सहाय्यक अभियंता (सर्वेक्षण) यांचेकडे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पाठपुरावा सुरु आहे.
(३) सदर भूभाग बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत झाल्यानंतर नागरिकांचे व दुकानांचे पुनर्वसन बृहन्मुंबई महानगरपालिकेस करणे शक्य होणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहर व उपनगरातील रस्ते खड्डेमुक्त करण्याबाबत**

**(२१) ६५६८४ (२८-०८-२०२३). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील रस्त्यांवर पावसाळयात दरवर्षी खड्डे बुजविण्यासाठी ४० कोटी खर्च केले जात असून या वर्षी सदर खर्च दुपटीपेक्षा जास्त दाखविला असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वर्षी महानगरपालिका ९२ कोटी खर्च करणार असून, शहर विभागासाठी १३ कोटी रुपये, पश्चिम उपनगरासाठी ६८ कोटी रुपये, तर पूर्व उपनगरासाठी ९ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, सदर चौकशीअन्वये मुंबई शहर व उपनगरातील सर्व रस्ते खड्डेमुक्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.

यावर्षी पावसाळ्यादरम्यान बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील खड्डे बुजविण्यासाठी प्रतिक्रियाशील डांबर, शीघ्रगतीने कठीण होणारे काँक्रिट, मास्टिक डांबर यांसारख्या विशेष तंत्रज्ञानाचा वापर होत असून, त्याकरिता मागील वर्षापेक्षा जास्त खर्च होणार आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील खड्डे बुजविण्यासाठी शहर विभागात एकूण रु. १७.५२ कोटी, पूर्व उपनगरात रु. ५१.९६ कोटी व पश्चिम उपनगराकरिता रु. ६३.५८ कोटी इतक्या रकमेची तरतूद बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आली आहे.
(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व रस्ते खड्डे मुक्त करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोल्डमिक्स व्यतिरिक्त रॅपिड हार्डनिंग कॉक्रिट, रिऍक्टिव अस्फाल्ट, मास्टीक अस्फाल्ट, कोल्ड मिक्स या तंत्रज्ञानांचा वापर केलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पेण (जि.रायगड) नगर परिषदेकरीता अमृत योजनेंतर्गत हेटवणे धरणातून थेट पाईपलाईन योजनेस प्राधान्याने देऊन निधी उपलब्ध करण्याबाबत

**(२२) ६५८१० (२३-०८-२०२३). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) ही नगर परिषद सन १८६५ या ब्रिटीश काळातील असून पेण या शहरास सद्यस्थितीत भोगावती नदीवरील पिंपळडोह येथे हेडवर्कव्दारे हेटवणे धरणातील पाणी उचलून पाणी पुरवठा केला जात आहे, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, पिंपळडोह येथे पाणी पोहोचेपर्यंत या पाण्याचा मोठया प्रमाणावर अपव्यय होत असून पेण शहराच्या टप्पा क्र.१ या पाणीपुरवठा योजनेचे आयुर्मान संपलेले असल्याने ही योजना प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पेण शहरातील नागरीकांना मागील काही वर्षांपासून पाणी टंचाईस सामोरे जावे लागत असल्याने नागरीकांमध्ये शासकीय यंत्रणेविरूध्द असंतोष पसरलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, हेटवणे धरणातून पाणी पुरवठा योजना राबवून पेण तालुक्यातील गावांना नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी आवश्यक निधी प्राप्त होण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, यांनी दिनांक ७ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री यांना लेखी निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, अमृत योजनेंतर्गत हेटवणे धरणातून थेट पाईपलाईनव्दारे पेण शहरास पाणी पुरवठा करण्याच्या योजनेस प्राधान्याने मंजूरी व प्रकल्प आराखडयास मंजूरी देवून सत्वर निधी मंजूर करण्यासाठी शासनकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०४-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) पेण शहराच्या टप्पा क्रमांक १ पाणीपुरवठा योजनेचे आयुर्मान पूर्ण झाल्याने पाणीटंचाईची समस्या सोडविण्यासाठी हेटवणे व आंबेघर उद्भव धरून पेण नगरपरिषदमार्फत योजना प्रस्तावित आहे.
(३), (४), (५) व (६) पेण नगरपरिषदमार्फत हेटवणे व आंबेघर या दोन धरणातून थेट पाईपलाईनद्वारे शहरास शुद्ध पाणीपुरवठा करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही पेण नगरपरिषदकडून सुरू आहे.
पेण नगरपरिषदेचा पाणीपुरवठा प्रकल्पाचा प्रस्ताव तांत्रिक मान्यता व आवश्यक बाबीच्या पूर्ततेसह नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत विहित मार्गाने शासनास प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत विचारात घेण्यात येईल.

---

## बुलडाणा जिल्ह्यात अवैध गौणखनिजाची वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांवर कारवाई करण्याबाबत

**(२३) ६६९०० (३१-०८-२०२३). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात रेती, गिट्टी, मुरुम अशा अवैध गौणखनिजाची वाहतूक करण्यासाठी वाळूमाफियांनी वाहनांना नंबर असतांनाही नंबर प्लेट न लावणे, अर्धवट नंबर लावणे, घासलेली दिसेल अशा नंबर प्लेट लावत असल्याचे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी वाहनधारकांवर कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार किती वाहनधारकांवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०३-२०२४) :** (१) होय.
(२) जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्या कार्यालयाचे दि.०१.०३.२०२३ रोजीचे अर्धशासकीय पत्र तसेच दि.१२.०५.२०२३

व दि.१२.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अशा वाहनांवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.
(३) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बुलढाणा येथील वायुवेग पथकाने गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या वाहनांना नंबर प्लेट न लावणे, चुकीच्या पध्दतीने नोंदणी क्रमांक प्रदर्शित करणे इ. कारणास्तव मोटार वाहन कायदा १९८८ च्या विविध कलमान्वये माहे मार्च २०२३ ते २६ जून २०२३ अखेरपर्यंत एकूण ४० दोषी वाहनांवर कारवाई करुन एकूण रु.६,४३,२५०/- इतका दंड वसुल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक शहरातील नाशिकरोड व जेलरोड विभागातील नवीन पाणीपुरवठा योजनेला अमृत-२ योजनेतर्गत प्रशासकीय मान्यता देण्याबाबत

**(२४) ६७०६९ (२७-०८-२०२३). ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील नाशिकरोड व जेलरोड विभागात महानगरपालिकेमार्फत चेहेडी बंधाऱ्यात दारणा नदीतून पाणीपुरवठा योजनेंतर्गत वारंवार दुषित व अळयायुक्त अशुद्ध पिण्याच्या पाण्याचा नळाव्दारे पुरवठा नागरिकांना होत असल्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक रोड व जेलरोड विभागातील लाखो नागरिकांना वांरवार होणाऱ्या अशुध्द व अळयायुक्त दुषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड असंतोषांचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील नाशिक रोड व जेलरोड विभागातील शहरातील नागरिकांना शुद्ध पाणी उपलब्ध व्हावे यासाठी दारणा धरणातून थेट पाईपलाईनव्दारे पाणी पुरवठा करण्यासाठी नवीन पाणीपुरवठा योजनेला अमृत-२ योजनेंतर्गत रु.२५० कोटी प्रस्तावास मान्यता देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (नाशिक पूर्व) यांनी दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री महोदय यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील अमृत-२ योजनेंतर्गत प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी व निधीची तरतूद करण्यासाठी नाशिक महानगरपालिकेमार्फत राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये सादर करण्यात आला असून, पाणी पुरवठा आराखडा प्रकल्प मंजुरी अभावी शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरील प्रलंबित पाणी पुरवठा योजनेला अमृत-२ योजनेंतर्गत तातडीने मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०४-२०२४) :** (१) व (२) नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील नाशिक रोड विभागात नाशिक रोड जलशुद्धीकरण केंद्र व गांधीनगर जलशुद्धीकरण केंद्र येथून पाण्याचा पुरवठा होतो.

नाशिक रोड जलशुद्धीकरण केंद्रास दारणा नदीवरील चेहेडी बंधाऱ्यातुन कच्चे पाणी (रॉ वॉटर) पुरविले जाते. दिनांक ०२ डिसेंबर, २०२० दरम्यान चेहेडी बंधारा येथे कच्च्या पाण्यात (रॉ वॉटर) वालदेवी नदीतुन वाहून आलेल्या सुक्ष्म लाल अळया (लार्वी) आढळून आल्या होत्या.

तद्नंतर, नाशिक महानगरपालिकेमार्फत दारणा नदीवरील चेहेडी बंधाऱ्यातुन कच्चे पाणी (रॉ वॉटर) उचलणे त्वरित बंद करून गंगापूर धरणातील थेट पाईपलाईनद्वारे कच्चे पाणी (रॉ वॉटर) नाशिक रोड जलशुद्धीकरण केंद्रात घेऊन शहरास स्वच्छ पाणी पुरवठा करण्यात आला आहे व आजही करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत शहरास स्वच्छ पाणीपुरवठा सुरु असुन नियमितपणे पाण्याचे नमुने शासकीय प्रयोगशाळेत तपासले जात असून सदर पाण्याचे नमुने पिण्यायोग्य आहे.
(३), (४) व (५) केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत नाशिक महानगरपालिकेच्या रुपये ३४२.५४ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक १२ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

---

## पेण (जि.रायगड) नगरपरिषदेंतर्गत भुयारी गटार योजनेंतर्गत शहरातील सांडपाण्याच्या उदभवणाऱ्या गंभीर प्रश्नाबाबत

**(२५) ६७२५९ (३१-०८-२०२३). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) शहराचा महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रामध्ये समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, झपाटयाने वाढणाऱ्या या शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार सांडपाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरात गटार व्यवस्था शुध्दिकरणाचा पर्याय उपलब्ध नसल्यामुळे नदीमध्ये सांडपाणी वाहून जात आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, पेण नगर परिषद हददीत भुयारी गटार योजना विकसित करणेकरीता डी.पी.आर. व्दारे सुवर्णजयंती राज्य नगरोत्थान योजनेंतर्गत मंजूरी देण्याबाबत शासनाकडून अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सत्वर मंजूरी देवून शहरातील सांडपाण्याचा गंभीर प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०४-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) पेण नगरपरिषदेमार्फत नगरपरिषद क्षेत्रातील भुयारी गटार योजनेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून सद्यस्थितीत सदर प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे तांत्रिक मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आल्याचे मुख्याधिकारी, पेण नगरपरिषद यांनी कळविले आहे.

पेण नगरपरिषदेचा भुयारी गटार प्रकल्पाचा प्रस्ताव नगरपरिषद प्रशासन संचालनालायामार्फत विहित मार्गाने शासनास प्राप्त झाल्यानंतर विचारात घेण्यात येईल.

---

## मुंबईतील वरळी येथील स्मशानभूमीत उंच चिमणी बसविण्याबाबत

**(२६) ६७५२३ (३१-०८-२०२३). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईत सुमारे ३४ हजार स्क्वेअर फुट जागेवर वरळी स्मशानभूमी असून हा उच्चभ्रू लोकवस्तीचा परिसर असल्याने अनेक मान्यवरांच्या पार्थिवावर या ठिकाणी अंत्यसंस्कार केल्यानंतर या परिसरात धूर पसरू नये म्हणून स्मशानभूमीला चिमणी लावण्यात आली होती, परंतु येथून जवळच असलेल्या एका मोठ्या हॉटेलच्या सोयीसाठी ही चिमणी काढण्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुरुस्ती आणि पुर्नबांधणीच्या नावाखाली या स्मशानभूमीची चिमणी काढण्यात आल्यामुळे अंत्यसंस्काराला आलेले नागरिकांना व परिसरातील लोकांना प्रचंड दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन १९३५ मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाबाई आंबेडकर यांच्या पार्थिवावर याच स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आल्याची नोंद या स्मशानभूमीत असून या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केल्यानंतर निर्माण झालेला धूर उंच चिमणी मार्फत हवेत सोडला जात होता त्यामुळे आजूबाजूला असलेल्या लोक वस्तीला याचा त्रास होत नव्हता परंतु महानगरपालिकेने ४० कोटीचा निधी खर्च करून ही त्या ठिकाणी छोट्या उंचीचे हॉल स्वरूपातील स्मशान तयार केले असल्याने आता धुराचा त्रास आजूबाजूला राहणारे लोकांना व मृतांचे संस्कार करण्यासाठी आलेल्या मृत व्यक्तीच्या नातेवाईकांना होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या स्मशानभूमीची उंच चिमणी पुन्हा बसविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत वरळी स्मशानभूमीच्या दुरुस्तीचे काम सन २०२० मध्ये सुरु करण्यात आले होते व त्यावेळी कमी क्षमतेची चिमणी बसविल्यामुळे अंत्यसंस्काराला येणाऱ्या नातेवाईकांना धुराचा त्रास होत आहे. तसेच आजुबाजूच्या परिसरातील लोकांना काही प्रमाणात धुराचा त्रास होत होता. तथापि दिनांक १५.०१.२०२४ पासून चिमणी दुरुस्तीचे काम पूर्ण झाले आहे.
(३) व ४) सन २०१८ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेसोबत झालेल्या समन्वय करारानुसार मे. हिरालाल पारेख ट्रस्ट यांनी त्यांच्या सीएसआर अंतर्गत रु. ४० कोटी रकमेच्या कामांना सुरुवात केली. त्यानुसार सदर प्रकल्पाच्या फेज-१ चे काम पूर्ण झाले. त्यादरम्यान ट्रस्टद्वारे कमी क्षमतेची धूर उत्सर्जन करणारी चिमणी बसविल्याकारणाने आजुबाजूच्या परिसरात काही प्रमाणात धुराचा त्रास होता. तथापि सदर दुरुस्तीचे काम दिनांक १५.०१.२०२४ पासून सुरु झाले असून, आता धुराचा त्रास पूर्णपणे कमी झाला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चांदवली साकी विहार, मुंबई येथे आरसीएम प्लांटमधून वायू प्रदूषण होत असून सदरचा प्लांट बंद करून दुस-या ठिकाणी हलविणेबाबत

**(२७) ६७५४२ (३०-०८-२०२३). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांदवली साकी विहार, मुंबई परिसरात सुरु असलेल्या एका आरसीएम प्लांटमधून या परिसरात मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आरसीएम प्लांटमुळे येथील नागरिकांना श्वास घेणे कठीण झाले असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी महानगरपालिकेच्या एल विभागाकडे व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ प्रशासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, चांदवली साकी विहार रोड येथील व्हिसीनिया, पालटियल, संघर्षनगर, गोदरेज अर्बन पार्क अशा निवासी इमारतीच्या परिसरात हा प्लांट २४ तास सुरु असल्याने या प्लांटमुळे निर्माण होणाऱ्या प्रदूषणाने जवळील रहिवाशी शाळा आणि रुग्णालय परिसरातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, १५० पेक्षा जास्त रहिवाशांनी हा प्रदूषणकारी प्लांट तातडीने बंद करावा अशी लेखी मागणी महानगरपालिका आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे चांदवली सिटीजन वेल्फेअर असोसिएनने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, येथील रहिवाशांनी केलेल्या तक्रारीची दखल घेऊन सदर आरसीएम प्लांट इतरत्र हलवण्यासाठी राज्य शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०३-२०२४) :** (१) व (२) प्रश्नाधीन विषयाबाबतची तक्रार दि. २०.०२.२०२३ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाली होती.
(३) हे अंशत: खरे आहे.
(४) व (५) सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रश्नाधीन उद्योगाच्या दि. १७.०३.२०२३ रोजी केलेल्या पाहणीदरम्यान, उद्योगाने संमतीपत्रातील अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यामुळे सदर उद्योगाची

रु. ५०,०००/- बँक हमी जप्त करून रु. १,००,०००/- बँक हमी जमा करून घेतलेली आहे. तसेच सदर उद्योगाच्या प्रदूषण नियंत्रण संयंत्रणेत सुधारण्याकरिता  दि. २८.०४.२०२३ रोजी अंतरिम निर्देश देण्यात आले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रतन इंडिया पॉवर लि. कंपनी (ता.तिवसा, जि.अमरावती) या कंपनीच्या उडणा-या राखेच्या प्रदूषणामुळे शेतपिकांचे नुकसान झाल्याबाबत**

**(२८) ६८०५३ (३१-०८-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रतन इंडिया पॉवर लि. कंपनी (ता.तिवसा,जि.अमरावती) या कंपनीच्या उडणाऱ्या राखेच्या प्रदूषणामुळे वाघोली बु (ता. जि. अमरावती) येथील १० शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे नुकसान झाल्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कंपनीच्या प्रोजेक्टमधून उडणाऱ्या राखेमुळे झालेल्या पिकांची नुकसानभरपाई कंपनीकडून मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०३-२०२४) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
सदर प्रकरणी दि. २६/०४/२०२३ रोजी संबंधीत शेतक-याच्या क्षेत्राची कृषी विभाग व इतर संबंधीत विभाग यांचेमार्फत संयुक्त पाहणी करण्यात आली. सदर पाहणीबाबत दि. १७/०७/२०२३ रोजीच्या जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, अमरावती यांच्या अहवालामधे नमुद करण्यात आले आहे की, प्रकाश संश्लेषण क्रिया मंदावल्याने झाडावरील फळांचे पोषण, योग्य पद्धतीने होत नसल्याचे व त्यामुळे उत्पादनात ४० टक्के घट येण्याचा निष्कर्ष समितीने काढला असून नुकसानीबाबत अहवाल तालुका कृषि अधिकारी, अमरावती मार्फत तहसिलदार, अमरावती यांच्याकडे सादर केला आहे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे सदर उद्योगाची दि. २६/०४/२०२३ रोजी पाहणी करण्यात आलीअसून सदर पाहणीमधे आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अमरावती यांनी दि. ०४.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये राख उडण्यास प्रतिबंध घालण्याकरीता करण्यात आलेल्या उपाययोजना पुरेशा नसल्यामुळे ताकीद देण्यात आली.  तसेच उद्योगाने राखेची विल्हेवाट योग्य प्रकारे करण्याबाबत फ्लाय ॲश नोटीफिकेशन १९९९ मधील तरतुदींचे अनुपालन केलेले नसल्याचे निदर्शनास आल्याने दि. १९.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये  महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळा कडून अंतरीम निर्देश देण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई अग्निशमन दलातील भरतीमध्ये उमेदवारांना अनेक अडचणी निर्माण होत असल्याबाबत**

**(२९) ६८१४९ (३१-०८-२०२३). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई अग्निशमन दलातील मेगा भरती प्रक्रिया सध्या सुरू असून या भरतीमध्ये उमेदवारांना अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शारिरीक चाचणीत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना आरोग्य चाचणीला सामोरे जावे लागत आहे मात्र महानगरपालिकेच्या काही प्रमुख रुग्णालयांनी रुग्णांच्या गर्दीचे कारण पुढे केल्याने आरोग्य चाचण्या प्रलंबित राहिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तसेच काही उमेदवारांनी भरती प्रक्रियेवर घेतलेला आक्षेप यांसारख्या प्रश्नांचा निपटारा करण्यातच अग्निशमन अधिकाऱ्यांचा वेळ जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने माहिती घेऊन सदरहू भरती प्रक्रिया सुलभ होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेंतर्गत मुंबई अग्निशमन दलातील “अग्निशामक” या संवर्गातील ९१० रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया दिनांक ११.०१.२०२३ ते दिनांक १४.०२.२०२३ या कालावधीत भावदेवी मैदान, दहिसर (पूर्व), मुंबई येथे सुरळीतपणे पार पाडण्यात आली.
(२) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत “अग्निशामक” प्रवर्गाच्या ८७३ रिक्त पदांची भरती प्रक्रिया पूर्ण झाली असून, सदर उमेदवारांची वैद्यकीय तपासणी पूर्ण करण्यात आली आहे.

त्यानुसार सहा महिन्यांच्या प्रशिक्षणाकरिता गुणवत्ता यादीतील प्रथम ५५० उमेदवारांचे दिनांक ०५.०७.२०२३ पासून मुंबई अग्निशमन दलाच्या सहा प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण सुरु करण्यात आले आहे.
(३) हे खरे नाही.

सदर बाब प्रशासकीय असल्याकारणाने प्रशासकीय कामकाजाची कार्यवाही सुरळीतपणे सुरु आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या रस्त्यांच्या कामाची चौकशी करण्याबाबत

**(३०) ६८५०५ (३१-०८-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ४०० किमी रस्त्यांची कामे ही स्पर्धात्मक बोली किंमतीव्दारे देतांना अधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करून बोली प्रक्रियेमध्ये असलेल्या नियमाचे पालन न करता ५ कंत्राटदारांना काम देण्यात आले असून याबाबत चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई वाहतुक पोलिस व इतर विभाग यांच्याकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाली नसतांना सुध्दा प्रस्तावित कामासाठी १० टक्के आगाऊ रक्कम कंत्राटदारांना देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्यांच्या कामात झालेल्या अनियमिततेबाबत लोकप्रतिनिधीसह नागरिकांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने महानगरपालिकेकडून कंत्राटदारांना दंड आकारण्यात आले असून, संबधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या गंभीर प्रकरणी सखोल चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) याबाबत लोकप्रतिनिधींनी चौकशी करण्याची मागणी केली आहे.
(२) कोणत्याही कंत्राटदाराला आजपर्यंत प्रस्तावित कामासाठी १० टक्के आगाऊ रक्कम देण्यात आलेली नाही.
(३) निविदेतील अटी व शर्तींचे पालन न करणाऱ्या कंत्राटदारांवर निविदेतील तरतुदीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.
(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत रस्त्यांच्या निविदेची कामे पारदर्शक पध्दतीने ई-निविदा ३ लिफाफा पध्दतीने

बोलीद्वारे नियमानुसार पार पाडण्यात आली आहेत. सदर रस्त्यांची कामे देतांना कोणत्याही नियमांचे उल्लंघन झालेले नाही. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील कोराडी औष्णिक वीज प्रकल्पातून होणारे प्रदूषण रोखण्याबाबत**

**(३१) ६९४५९ (३०-०८-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.आदित्य ठाकरे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हयातील कोराडी औष्णिक वीज केंद्रालगत ३०-४० कि.मी. परिसरातील गावांना प्रकल्पातील राखेमुळे जलप्रदुषणाचा विळखा बसला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागातील भूपृष्ठावरील पाणी व भूजल यामध्ये शिसे, आर्सेनिक, मर्क्युरी यासारखे जड धातू आणि इतर धोकादायक रासायनिक घटक मिसळत असल्याने अतिगंभीर जीवघेण्या आजारांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन सदर वाढते प्रदूषण रोखण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही.
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी यांनी वेळोवेळी पाहणी करुन विविध विहीरीचे /नदयांच्या पाण्याचे नमुने सकंलित केले. पृथ:करण अहवालानुसार भुजल पाण्याच्या नमुन्यामध्ये जड धातुंचे प्रमाण आढळुन आले नाही.
(२) हे खरे नाही.
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे कोणत्याही प्रकारची तक्रार किंवा निवेदन प्राप्त झालेले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील नागरी समस्यांचे निराकरण करण्याबाबत**

**(३२) ७०९३३ (३१-०८-२०२३). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत मागील एक वर्षापासून महानगरपालिकेत प्रशासक नसल्याने पाणी, गटर, मीटरसह मुंबईच्या नागरी प्रश्नांच्या उहापोह करणारी यंत्रणा कोलमडून पडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे खराब रस्ते, तुंबलेल्या ड्रेनेजसह खड्डयांच्या त्रासाने मुंबईकर त्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून व येथील नागरी समस्यांच्या विभागावर आढावा घेवून त्यांचे निराकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई शहर व उपनगरास प्रतिदिन सरासरी ३९०० दशलक्ष लिटर इतका पाणी पुरवठा केला जातो व सध्या पाणी पुरवठा सुरळीत / नियमित आहे. तसेच मुंबई शहरामध्ये बहुतांश पाण्याचे मीटर खाजगी मालकीचे असतात व त्यासंबंधीचे कोणतेही नागरीक प्रश्न अथवा समस्या निराकरण प्रलंबित नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मलनि:सारण प्रचालन विभागामार्फत मुंबई शहर व उपनगरातील एकूण २०३० कि.मी. लांबीच्या मलवाहिन्यांचे परिरक्षण करण्यात येत असून, प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निवारण विहित वेळेत करण्यात येते. सदर

विभागामध्ये पूर्व उपनगरे, पश्चिम उपनगरे व शहर अशी ३ तक्रार निवारण केंद्रे २४ X ७ कार्यरत आहेत. प्राप्त झालेल्या तक्रारींचे सदर निवारण केंद्रांमार्फत त्वरीत निवारण करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तळोजा (ता.पनवेल,जि.रायगड) एमआयडीसी मधून रात्री हवेत रसायने सोडल्याने नागरिकांना होत असलेला त्रास

**(३३) ७१०१५ (३१-०८-२०२३). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) एमआयडीसी मधून रात्री बारानंतर हवेत रसायने सोडली जात असून, या रसायनाच्या उग्र वासामुळे तळोजा नावडे रोड, पाली, खारघर परिसरातील नागरिकांना नाहक त्रास होत असून कंपन्यांकडून वारंवार असे प्रकार होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तळोजा औद्योगिक क्षेत्रातून रात्रीच्या वेळी सोडणाऱ्या रसायनांच्या उग्र वासांमुळे मळमळ, चक्कर येणे, श्वास घेण्यास अडथळा असे त्रास रहिवाशांना होत असल्याने रात्री सोडण्यात येणाऱ्या या केमिकलच्या उग्र वासाविरोधात काही सामाजिक संस्थाने लोकायुक्तांकडे याबाबतची तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार लोकायुक्तांनी प्रदूषण महामंडळ आणि पनवेलच्या तहसीलदाराला पाहणी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या त्यानुसार तहसीलदार कार्यालयाच्या पथकाने केलेल्या पाहणीमध्ये तळोजा औद्योगिक परिसर आणि जवळपास गावे आणि वसाहतीमध्ये उग्र वास येत असल्याचा अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रसायनाच्या उग्रवासाने घराच्या खिडक्या बंद ठेवून रहिवाशांना झोपावे लागत असल्याने प्रदूषण मंडळाने या कंपन्यांवर तात्काळ कार्यवाही करावी अशी मागणी रहिवाशांकडून केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त एमआयडीसीतील कंपन्यांवर कारवाई करण्यासह सदर कारखान्यातून हवेत सोडण्यात येणाऱ्या रसायने पूर्णत: बंद होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०३-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
(४) व (५) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास रसायनाच्या उग्रवासाच्या अनुषंगाने तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित कंपन्यांवर आवश्यक ती कारवाई करण्यात येते. रोजीच्या आदेशानुसार, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन यांनी विशेष तपासणी पथक (Special Investigation Team) स्थापना केली असुन या पथकाने तळोजा औद्योगिक परीसराची शास्त्रीय पाहणी व उद्योगांची तपासणी केलेली आहे व अंतरीम अहवाल सादर केला असून अहवाल बनवण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. तथापि, पाहणी दरम्यान दोषी आढळलेल्या ०४ उद्योगावर पर्यावरणीय कायद्यानुसार त्वरीत उत्पादन बंदचे आदेश दिले आहेत.

तसेच, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उग्र वासाच्या तक्रारीच्या अनुषंगाने तळोजा औद्योगिक परिसरात रात्रीच्या वेळेस पाहणी केली जाते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मागील वर्षात हवा व जल प्रदूषण करणा-या ०९ उदयोगांना उत्पादन बंद करण्याचे आदेश पारित केलेले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील छेडा नगर, चेंबूर येथील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्याबाबत

**(३४) ७१५०९ (०४-०९-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील छेडा नगर, चेंबूर येथील रस्त्यांची व ड्रेनेज व्यवस्थेची दुरावस्था झाली असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी उक्त रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणेबाबतची विनंती महानगरपालिकेकडे दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) छेडा नगर येथील छेडा नगर रस्ता क्र. १, २, ३, व ४ च्या साधारणत: ११४५ मी. लांबीच्या पर्जन्य जलवाहिनीचे काम पूर्ण झाले आहे. तसेच रस्ता क्र. १ चे १०० मी. लांबीचे व रस्ता क्र. ३ चे ६० मी. लांबीचे रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित रस्ता क्र. १, २, ३ व ४ या रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणाचे व पर्जन्य जलवाहिनीचे उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.

छेडा नगर खाजगी अभिन्यासातील एकूण १३ अंतर्गत रस्त्यांच्या रुंदीकरणाच्या कामांना मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ६३ के अंतर्गत मंजुरी घेण्यात आली आहे. तसेच सदर रस्त्यांचे अंदाजपत्रक तयार करण्याकरिता महानगरपालिका सल्लागार नेमण्याकरिता निविदा प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु करण्यात आलेल्या कोवीड केंद्रातील उपकरणे रुग्णालयांना उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३५) ७१५५२ (१२-०९-२०२३). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यात कोविडचा प्रादुर्भाव झाल्यानंतर मुंबई महानगरपालिकेने विविध सरकारी प्राधिकरणाच्या सहकार्याने मुंबई शहर आणि उपनगरात १० जंबो कोविड केंद्रे सुरू केली असून तिसऱ्या लाटेनंतर उक्त कोविड केंद्रे टप्याटप्याने बंद करण्यात आली आहेत. सदरहू केंद्रे बंद होऊन जवळपास वर्ष उलटून गेले, परंतु ती उपकरणे अनेक ठिकाणी पडून असून ती बंद पडणार असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या गोदामात व्हेंटिलेटर, ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर, ऑक्सिजन सिलेंडर यासारखी जीवन रक्षक उपकरणे ही पडून असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईसह राज्यातील अनेक रुग्णालयात अशा उपकरणांचा तुटवडा असल्याने सदरहू उपकरणे पाठविणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात उभारण्यात आलेली जम्बो कोविड केंद्रे दिनांक ३१ जुलै, २०२२ पर्यंत टप्प्याटप्प्याने बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सदर केंद्रातील उपकरणे, साधने, संसाधने, साहित्य यांचे वितरण बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उपनगरीय रुग्णालये, महाविद्यालये व संस्था तसेच मुंबईस्थित केंद्र शासनाची रुग्णालये, आरोग्य संस्था आणि निम्नशासकीय संस्था यांना करण्यात आले आहे व सदर वितरण प्रक्रिया आजही सुरु आहे.

तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नजीकच्या काळात पूर्णत्वास येणाऱ्या रुग्णालय प्रकल्पांसाठी उपकरणांचा राखीव साठा करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नागपूर येथील मिहान प्रकल्पातील वीस कंपन्यांच्या ताब्यात असलेली जमीन परत घेण्याबाबत

**(३६) ७१५८८ (२२-११-२०२३). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या (एमएडीसी) मिहान नागपूर प्रकल्पात जागा घेतलेल्या २० कंपन्यांचे स्वीकृती पत्र सुमारे एक वर्षांपूर्वीच विकास आयुक्तांनी रद्द केले असून सदर कंपन्यांकडे असलेली २०३ कोटी रुपयांची जमीन परत घेण्याबाबत तातडीने कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू २० कंपन्यांनी टोकन रक्कम (इएमडी) फक्त २३ कोटी रुपये देत सुमारे २०३ कोटी रुपयांच्या जमिनीवर अतिक्रमण केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीतील (एमएडीसी) काही वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी हे आर्थिक संगणमत करून सदर प्रकरणाच्या फाईली गायब करीत असल्याचे निदर्शनास आले असून सदर भागातील जमिनीच्या किंमती झपाट्याने वाढत असल्याने बहुतांश विकास कंपन्या व सह विकासाचा दर्जा मिळालेल्या कंपन्या जमिनी परत करण्यास टाळाटाळ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मिहान प्रकल्पामध्ये काही कंपन्यांनी फक्त टोकन रक्कम भरून जमिनीच्या प्रस्तावाच्या पत्राच्या आधारे कंपनीची उभारणी न करता कोट्यवधी रुपयाचे कर्ज घेतले असल्याची बाब माहे जून, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, कॅगने मिहानच्या जमीन वाटपाच्या धोरणाबाबत व अनियमितेवर ताशेरे ओढले होते, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार मिहान प्रकल्पातील सदर वीस कंपन्यांच्या ताब्यातील जमीन परत घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०३-२०२४) :** (१) ज्या कंपन्यांचे स्विकृती पत्र विकास आयुक्तांनी रद्द केले आहे, अशा कंपन्यांकडून जमीन परत घेण्याची कार्यवाही महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (एमएडीसी) यांचे कडून सुरु आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) यासंदर्भात कॅगने काही मुद्दे उपस्थित केले होते.त्याबाबतची कार्यवाही महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीमार्फत (एमएडीसी) करण्यात येत आहे.

---

### मुंबई उपनगरातील अंधेरी पूर्व व पश्चिम उपनगराला जोडणारा गोखले पूल वाहतुकीकरीता सुरु करण्याबाबत

**(३७) ७२०५० (०८-०२-२०२४). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील अंधेरी पूर्व व पश्चिम उपनगराला जोडणारा गोखले पूल बांधकामासाठी महानगरपालिकेने माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वर्क ऑर्डर दिल्यावर माहे मे, २०२३ पुर्वी म्हणजेच पावसाळा चालु होण्याच्या अगोदर एक लेन वाहतुकीकरीता सुरु होईल अशी जाहीर केले असतांना देखील दिनांक ४ सप्टेंबर, २०२३ च्या पाहणी दरम्यान अजून ८५ दिवस लागतील असे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये जाहिर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गोखले पूलची एक लेन वाहतुकीकरीता चालु होण्यास आणखी ४ फेब्रुवारी, २०२४ पर्यंत वेळ लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पूलाचा बारकाईने अभ्यास व कामाचे वेळापत्रक तयार करण्यात आले होते तर ते वेळापत्रकानुसार पूलाची एक लेन वाहतकीकरीता चालु करण्यास किती कालावधी लागणार आहे याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री व महानगरपालिका आयुक्त यांना निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने गोखले पूलाचे बांधकाम त्वरीत पूर्ण करण्याबाबत तसेच कामात हलगर्जीपणा करणाऱ्या महानगरपालिकेच्या अभियंता व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) हे खरे नाही.

दिनांक ४ सप्टेंबर, २०२३ च्या पाहणी दरम्यान बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्यामार्फत कामासाठी अजून ८५ दिवस लागतील असे सांगण्यात आले नाही.
(२), (३) व (४) गोखले पुलाच्या पहिल्या टप्प्यातील पुलाचे काम पूर्ण करुन दिनांक २६.०२.२०२४ रोजी लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले आहे.
५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण-डोंबिवली सहाय्यक संचालक (जि.ठाणे) नगररचना यांनी महानगरपालिकेचा कोट्यवधीचा महसूल बुडविल्याबाबत

**(३८) ७२७२९ (१४-०२-२०२४). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली सहाय्यक संचालक नगररचना (जि.ठाणे) यांनी महानगरपालिकेचा कोट्यवधीचा महसूल बुडविल्याबाबत मुल्यनिर्धारण विभाग, पुणे तसेच शासन स्तरावर तक्रार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची तक्रार यापूर्वी देखील सामाजिक कार्यकर्ते श्री.निवास घाणेकर यांनी तत्कालीन महानगरपालिका आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्याकडे केली असता त्याकडे सोईस्करपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे किती नुकसान झाले असून, यामध्ये दोषी आढळून आलेल्या संबंधिताविरुद्ध कारवाई करुन शासनाच्या बुडविलेल्या महसुलाची वसुली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०४-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अशा आशयाची तक्रार महानगरपालिकेस प्राप्त झाली असून, सदर तक्रारीतील विविध पाच बांधकाम परवानगी प्रकरणी वेळोवेळी सुधारित बांधकाम परवानगी तसेच, बांधकाम पुर्णत्वाचे दाखले देण्यात आलेले आहेत.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने या प्रकरणी प्रकरण निहाय तपासणी केली असता, महानगरपालिकेचा महसूल बुडविल्याचे सकृतदर्शनी दिसून आले नाही.

याबाबतचा सविस्तर अहवाल कागदपत्रांसह कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने नगररचना संचलनालयास दि.१७.११.२०२३ रोजी सादर केलेला आहे.

तत्कालीन आयुक्तांनी प्राप्त तक्रारीकडे दुर्लक्ष केले ही बाब वस्तुस्थितीस धरून नाही.

(३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने केलेल्या चौकशीत महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे आढळून न आल्याने, संबंधितांविरूध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पारसी पंचायत रोड, पंपहाऊस अंधेरी भुयारी मार्ग जंक्शनला स्वर्गीय आमदार रमेश लटके चौक असे नामांतर व चौक बांधण्याबाबत

**(३९) ७२९७० (११-०२-२०२४). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारसी पंचायत रोड,पंपहाऊस अंधेरी भुयारी मार्ग जंक्शनला स्वर्गीय आमदार रमेश लटके चौक असे नामांतर व चौक बांधण्याबाबत लोकप्रतिनिधिंनी दिनांक १६ मे, २०२२ रोजी व तदनंतर अनेक वेळा आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्वर्गीय आमदार रमेश लटके चौक बांधण्यासाठी मुंबई महानगरपालिका के/पूर्व यांच्याकडे वारंवार पाठपुरावा करुनही अदयाप ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही हे ही खरे आहे काय, ना हरकत प्रमाणपत्र देण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने पारसी पंचायत रोड, पंपहाऊस अंधेरी भुयारी मार्ग जंक्शनला स्वर्गीय आमदार रमेश लटके चौक असे नामांतर व चौक बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदर चौकाचे नामकरण "माजी शाखाप्रमुख स्व. राम हरगुडे चौक" असे करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २३.०८.२०१९ रोजीच्या के/पूर्व विभागाच्या प्रभाग समितीमध्ये मंजूर करण्यात आलेला असून, सदर प्रस्तावास स्थापत्य समितीच्या मंजुरीची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

सदर प्रस्तावावरील निर्णय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर स्थानिक लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावावर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईसह उपनगरातील बेस्ट आगार क्षेत्रातील स्वच्छता गृहांची दुरवस्था झाल्याने बेस्ट कामगारांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(४०) ७३०४९ (१५-०२-२०२४). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह उपनगरातील २७ बेस्ट आगार क्षेत्रात ५१ बस स्थानके व ११२ टर्मिनसमध्ये सुमारे २४ हजार बेस्ट कामगार कार्यरत असून त्या ठिकाणी असलेल्या स्वच्छता गृहांची अत्यंत दुरवस्था झाल्याने बेस्ट कामगारांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत दिनांक १ ऑगस्ट,२०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणांची शासनाने चौकशी करुन बेस्ट आगारातील शौचालये स्वच्छता गृहांची दररोज स्वच्छता राखण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) बेस्ट बसआगार, बसस्थानके तसेच टर्मिनस येथील काही स्वच्छतागृहांची दुरावस्था झाली आहे, ही वस्तुस्थिती आहे. यापैकी बहुतांश स्वच्छतागृहांच्या नुतनीकरणाची कामे टप्प्याटप्प्याने करण्यात येत आहेत. तथापि कर्मचाऱ्यांच्या आरोग्यावर अपायकारक परिणाम होऊ नये याकरिता सर्व स्वच्छतागृहे दैनंदिन तत्वावर स्वच्छ करण्यात येतात.
(२) बेस्ट उपक्रमाचे बसआगार, बसस्थानके तसेच टर्मिनस येथील स्वच्छतागृहे दररोज स्वच्छ करण्यात येतात. याकरिता "स्वच्छक कर्मचारी" उपलब्ध असून त्यांना शौचालयाच्या स्वच्छतेकरिता ब्लिचिंग पावडर, सोडा, नॅपथॅलिन टॅबलेट्स इत्यादी स्वच्छतेकरिता आवश्यक सामग्री पुरविण्यात येते. तसेच वाहतुक अधिकाऱ्यांच्या वतीने स्वच्छतेच्या कामावर देखरेख ठेवण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील कांदिवली (पूर्व) आकुर्ली रोड येथील महानगरपालिकेचे प्रसूतिगृहाच्या पुनर्विकासाबाबत

**(४१) ७३०६२ (११-०२-२०२४). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कांदिवली (पूर्व) आकुर्ली रोड येथील महानगरपालिकेचे प्रसूतिगृहाच्या पुनर्विकासाचे काम गत ४ वर्षापासून सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे परिसरातील सर्वसामान्य गर्भवती महिलांना त्रास सहन करावा लागत असून वारंवार तक्रारी होऊनही पुनर्विकासाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने माहिती घेऊन पुनर्विकासाचे काम पूर्ण करुन प्रसूतीगृह सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) कांदिवली (पूर्व) परिसरातील सर्वसामान्य गर्भवती महिलांना प्रसुतीपूर्व व प्रसुतीपश्चात सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता सदर प्रसुतीगृह तात्पुरत्या स्वरुपात जवळच कांदिवली (पूर्व) येथील महानगरपालिका इमारत, ऑक्सफर्ड शाळेजवळ, केलीपाडा, ठाकूर व्हिलेज येथे स्थलांतरीत करण्यात आले आहे. सदर ठिकणी गरोदर मातांना प्रसुतीपूर्व व प्रसुतीपश्चात सुविधा पुरविण्यात येत आहेत.
(३) सदर प्रसुतीगृहाच्या पुनर्विकासाचा आराखडा महानगरपालिका वास्तुशास्त्रज्ञ यांचेमार्फत बनविण्यात आला असून, पुनर्विकासाबाबतची निविदा काढण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य पायाभूत सुविधा कक्षामार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भोर (जि. पुणे) या नगरपरिषदेस वैशिष्टपूर्ण योजनेतंर्गत विशेष अनुदान मिळण्याबाबत

**(४२) ७३१२९ (११-०२-२०२४). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१) भोर (जि. पुणे) या नगरपरिषदेस वैशिष्टपूर्ण योजनेतंर्गत (लेखाशिर्ष ९२१७०६०३) विशेष अनुदान मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री यांना दिनांक १३/९/२०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय

२) असल्यास, भोर नगरपरिषदेस अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०४-२०२४) :** (१), (२) व (३) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील मंजूर अर्थसंकल्पीत निधी प्राप्त मागण्यांचा विचार करून निधी वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येते.

---

## बोरिवली आणि दहिसरच्या, (मुंबई) लिक रोड नजिकच्या गणपत पाटील नगराला मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध होण्याबाबत

**(४३) ७३२५६ (११-०२-२०२४). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या उपनगरातील बोरिवली आणि दहिसरच्या लिंक रोडला संलग्न असणाऱ्या गणपत पाटील नगरमध्ये अजूनही मुलभूत सुविधा मिळत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नगरामध्ये सुमारे ४३ हजार लोकवस्ती असून जाही येथे पक्के रस्ते नसून पावसाळयात स्थानिकांना ये-जा करणे देखील जिकरीचे होत असून, पाणी व वीज जोडणीपासून आजही येथील रहिवाशी वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उपरोक्तप्रमाणे मुलभूत सोयी-सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) गणपत पाटील नगर ही दहिसर (पश्चिम) येथील १२० फुट रुंद लिंक रोडलगत अंदाजे २५ ते ३० एकर खाजगी जमिनीवर मोठी झोपडपट्टी सदृश वसाहत आहे. सदर झोपडपट्टी महाराष्ट्र झोपडपट्टी अधिनियम १९७१ नुसार गलिच्छ वस्ती झोपडपट्टी म्हणून घोषित करण्यात आलेली नाही. तसेच सदर भूभागावर नैसर्गिक अधिवास असे आरक्षण आहे. यास्तव सदर ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत रस्ते, पायवाटा, गटारे, पथदिवे इत्यादी सुविधा पुरविण्यात येत नाहीत. तथापि मानवतेच्या दृष्टिकोनातून गणपत पाटील नगर येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात:-

• साफसफाई, धुम्र फवारणी, किटकनाशक फवारणी इत्यादी सुविधा पुरविण्यात येतात.

• सदर परिसरात रोगराई पसरु नये याकरिता नागरिकांची लसीकरण शिबिरे आयोजित केली जातात.

• लहान मुलांना जंताची व विटॅमिन “ए” ची औषधे देण्यात येतात.
• सदर परिसरातील घरोघरी जाऊन आरोग्यविषयक जनजागृती कार्यक्रम राबविले जातात.
• गणपत पाटील नगर गल्ली नं. १४ च्या बाहेर लिंकरोड लगत “स्वच्छ भारत मिशन” अंतर्गत ६० आसनी शौचालयाची व्यवस्था करण्यात आली आहे.
• सर्वांसाठी पाणी या धोरणानुसार दिनांक ३१.०१.२०२४ पर्यंत गणपत पाटील नगर येथे एकूण १३०९ जलजोडण्या देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील बेस्टच्या चलो कार्ड च्या तुटवडयामुळे प्रवाशांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(४४) ७३३२५ (१६-०२-२०२४). श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील बेस्ट बसमधील गर्दी, सुट्टया पैशांचा निर्माण होत असलेला प्रश्न आणि विविध कारणांमुळे प्रवासी आणि बस वाहकांमध्ये वारंवार उडणारे खटके लक्षात घेता बेस्ट उपक्रमाने “चलो कार्ड” योजना आणली व योजनेला प्रवाशांनही भरभरुन पाठिंबा दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या या “चलो कार्ड” चा तुटवडा निर्माण झाला असून प्रवाशांना सदरील कार्ड मिळत नसल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन सदर कार्ड प्रवाशांना तातडीने उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) सुट्टया पैशांची समस्या ही गेली अनेक वर्षे अन्य व्यावहारिक आस्थापनांप्रमाणेच बेस्ट उपक्रमाला देखील त्रासदायक ठरत होती. यामुळे प्रवासी आणि बसवाहक यांच्यामध्ये वादाचे प्रसंग उद्भवत होते. शिवाय रोखीचे व्यवहार हाताळण्याकरिता असलेला आस्थापना खर्च देखील मोठ्या प्रमाणावर आहे. या सर्व समस्या विचारात घेऊन बेस्ट उपक्रमाने अद्ययावत Automatic Fare Collection System ही प्रवासभाडे आकारण्याची पध्दती सुरु केली.
(२) व (३) सद्य:स्थितीत बेस्ट उपक्रमाकडे “चलो स्मार्ट कार्ड” पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत. शिवाय भविष्यातील आवश्यकता विचारात घेऊन बेस्ट उपक्रमामार्फत अतिरिक्त कार्डची मागणी नोंदविण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई ते मुंबई जलवाहतूक सेवा पूर्ण करण्याबाबत**

**(४५) ७३८०१ (१७-०२-२०२४). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील नेरूळ येथे साडेतीन हेक्टर क्षेत्रावर १११ कोटी रुपये खर्चून बांधलेल्या जेट्टीवरून नवी मुंबई ते मुंबईतील भाऊचा धक्कादरम्यान जलवाहतूक सेवा सिडकोमार्फत सुरु होणार असल्याची बाब दिनांक १४ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाहतूक सेवा सुरु करण्याकरिता भागीदार निवडण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरु केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, नवी मुंबइ ते मुंबई जलवाहतूक सेवा विनाविलंब पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०३-२०२४) :** (१), (२), (३) व (४) हे खरे आहे.

नवी मुंबईत जल वाहतुकीकरीता नेरुळ येथे प्रवासी जल वाहतुक टर्मिनसच्या उभारणीचे काम दि.३१.१०.२०२१ रोजी पूर्ण झाले असून मेरीटाईम बोर्डने नेरुळ-भाऊचा धक्का, नेरुळ-एलिफंटा, नेरुळ-जेएनपीटी अशा वाहतुकीकरीता जलसेवा देणा-या संस्थांना परवाना जारी केला आहे. सिडको संचालक मंडळाच्या दि.११.६.२०२२ रोजीच्या मान्यतेनुसार जलवाहतुक परिचालक नेमणुक सिडकोमार्फत प्रकल्प संचालीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी परिचालक नेमणुकीकरीता प्रथमत: दि.१२.९.२०२२ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या व प्रथम बोली दरम्यान केवळ एक बोली प्रतिसादामुळे निविदा रद्द करण्यात आली असून निविदेच्या अटी व शर्तीत बदल करुन दुस-यांदा दि.१५.९.२०२३ रोजी निविदा मागविल्या होत्या. तथापि, एकही बोली प्राप्त न झाल्याने निविदा रद्द करण्यात आली आहे. सद्यस्थितीत, निविदेच्या अटी व शर्ती शिथिल करुन निविदा प्रक्रिया नव्याने सुरु असून परिचालकाची नेमणूक करुन जलवाहतुक सुरु करण्यात येणार आहे.

---

## नवी मुंबई शहरातील धोकादायक इमारतीवर कारवाई करण्याबाबत

**(४६) ७३८८९ (१७-०२-२०२४). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई तसेच ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक इमारतीचा प्रश्न गेल्या १५ वर्षापासून सातत्याने ऐरणीवर येत असून महानगरपालिका प्रशासनाने शहरातील धोकादायक इमारतीची यादी जाहीर करून ३० वर्षाहून जुन्या इमारतींचे संरचना परीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करून घेण्याचे आवाहन केले होते अन्यथा २५ हजार रुपये दंड ठोठावण्याचा इशारा देखील देण्यात आल्याचे दिनांक २७ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार किती धोकादायक इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट झाले आहे व किती इमारती रिकाम्या करण्यात आल्या आहेत,
(३) असल्यास, जर रहिवाशी धोकादायक इमारत सोडण्यास तयार नसतील तर प्रशासनाने या इमारती रिकाम्या करण्यासाठी कठोर भूमिका घेणे गरजेचे असून महानगरपालिका धोकादायक इमारतीची फक्त यादी प्रसिद्ध करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शहरातील धोकादायक इमारतीवर कारवाई करण्यास महानगरपालिका प्रशासन उदासीन असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०४-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) • नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात माहे जानेवारी २०२४ अखेर पर्यंत सी-१, सी-२ए, सी-२बी व सी-३ या प्रवर्गात एकूण ५३० इमारती धोकादायक म्हणून घोषित करण्यात आलेल्या आहेत.
• त्यापैकी अतिधोकादायक सी-१ प्रवर्गातील एकूण ६८ इमारतींपैकी २५ इमारती रिक्त करण्यात आलेल्या आहेत.
(३) व (४) • नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सी-१ इमारतींना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६८ मधील तरतूदीनुसार सर्व इमारतीमधील रहिवास वापर थांबवून इमारत रिकामी करण्यासंदर्भात सूचना देण्यात आलेल्या आहेत.

• दि.०५.११.२०१५ शासन परिपत्रकातील सूचनांनुसार धोकादायक इमारतीचा पाणीपुरवठा करणे/ विद्युत पुरवठा करणे/पोलीसांच्या मदतीने इमारत रिकामी करण्याबाबतची कारवाई करण्यात येते.

• त्याअनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात माहे जानेवारी २०२४ पर्यंत सी-१ या प्रवर्गातील एकूण ६८ इमारतींना, इमारती रिकाम्या करण्याच्या नोटिसा देण्यात आलेल्या आहे.

• त्यापैकी २५ इमारती रिक्त केल्या असून, उर्वरित ४३ इमारतीमधील रहिवास थांबवून, इमारती रिकाम्या करण्याबाबत महानगरपालिकेमार्फत आवश्यक ती कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नगरपरिषद उमरखेड ( जि.यवतमाळ ) करिता वैशिष्टयपूर्ण योजना सन २०१७-१८ साठी लेखाशिर्ष (२२१७ १३०१) अंतर्गत मंजूर असलेल्या निधीस मुदतवाढ देण्याबाबत**

**(४७) ७४०३६ (११-०२-२०२४). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैशिष्टयपूर्ण योजना सन २०१७-१८ साठी लेखाशिर्ष (२२१७ १३०१) अंतर्गत नगरपरिषद उमरखेड (जि.यवतमाळ) करिता मंजूर असलेल्या निधीकरीता मुदतवाढ देण्याबाबत नगरपरिषद कार्यालय, उमरखेड यांनी दि.६ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय यांच्याकडे विनंती केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणी शासनाने मान्य केली आहे काय व त्यानुषंगाने सदरहू मुदतवाढ कधीपर्यंत देण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०४-२०२४) :** (१), (२) व (३) वित्त विभागाचे शासन निर्णय क्र. १०.२१/प्र.क्र.६३/अर्थोपाय दिनांक १६ ऑक्टोबर, २०२३ अन्वये दि. ३१ मार्च, २०२२ पूर्वी वितरीत केलेला व दि. ३१ मार्च, २०२३ पर्यंत अखर्चित असलेला निधी दि. २८ फेब्रुवारी, २०२४ पर्यंत खर्च करण्यास मुदतवाढ देण्यात आली होती.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील समुद्र किना-यांच्या स्वच्छतेसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने उपलब्ध करुन दिलेल्या बीच क्लीन मशीनचे कंत्राट संपले असल्याबाबत**

**(४८) ७५१९६ (१६-०२-२०२४). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील समुद्र किनाऱ्यांच्या स्वच्छतेसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने उपलब्ध करुन दिलेल्या बीच क्लीन मशीनचा कंत्राट कालावधी दिनांक २९ ऑगस्ट, २०२३ रोजी संपुष्टात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समुद्र किनारी वाहून येणारा कचरा पुन्हा साचला जात असल्याने नागरीकांनी मालवण नगरपालिकेस संपर्क केला असता मशीनचे कंत्राट संपले असल्याचे सांगून दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मशीनच्या कंत्राटाला मुदतवाढ देण्यासाठी संबंधित विभागाकडून प्रयत्न केले जात नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने माहिती घेऊन उक्त मशीनच्या कंत्राटाला मुदतवाढ मिळण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५ ) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) सिंधुदुर्ग जिल्हयातील समुद्र किनारे स्वच्छ करण्यासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने उपलब्ध करुन दिलेल्या बीच क्लिनींग मशिनचा कंत्राट कालावधी संपुष्टात आला आहे. त्यामुळे सदर मशीनच्या कंत्राटाला पुढील कालावधीसाठी मुदतवाढ देण्याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास विनंती केली असता, त्यांनी सदर कंत्राटाला मुदतवाढ देण्यात येणार नसल्याचे कळविले आहे. सद्यस्थितीत समुद्रकिनारी वाहून येणारा कचरा मालवण नगरपरिषदेकडून मनुष्यबळाव्दारे स्वच्छ करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील बेस्ट बसमधील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करण्याबाबत**

**(४९) ७५३९४ (१५-०२-२०२४). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील बेस्ट बसमधील कंत्राटदारांच्या कंत्राटी कामगारांनी एक आठवडा पुकारलेल्या संपामुळे बेस्ट प्रशासनाची तारांबळ उडाली असून लाखो प्रवाशांना मोठ्या प्रमाणात आर्थिक त्रास सहन करावा लागला असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंत्राटदाराच्या मनमानी कारभारामुळे कंत्राटी कामगारांनी अचानक संप केल्याने बेस्टचे कोट्यवधी रुपयाचे नुकसान होत असून हे कामगार कायमस्वरूपी कामगारांप्रमाणे काम करीत असतानाही वेतनात तफावत, गणवेश आणि मूलभूत सेवा सुविधा पासून बेस्ट प्रशासनाकडून वंचित ठेवले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या न्याय मागण्या मान्य करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) बेस्ट उपक्रमाच्या बससेवेमध्ये कार्यरत असलेल्या बसपुरवठादार व्यवसाय संस्थांच्या कामगारांनी माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये अचानक संप पुकारल्यानंतर बेस्ट उपक्रमाने अन्य विभागात कार्यरत असलेल्या बसचालकांना तातडीने वाहतूक विभागात आणून जास्तीत जास्त बसगाड्या रस्त्यावर प्रवर्तित केल्या. परिणामी प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होणार नाही याची दक्षता बेस्ट उपक्रमाने घेतली आहे.
(२) बेस्ट उपक्रमाने बसप्रवर्तन खर्चात कपात करण्याकरिता भाडेतत्वावर बसगाड्यांचा समावेश बेस्ट उपक्रमाच्या ताफ्यात केला आहे.
भाडेतत्वावर बसगाड्या घेताना सदर बसगाड्यांवरील बसचालक आणि बसगाड्यांच्या देखभालीकरिता आवश्यक असलेले कर्मचारी यांची पूर्तता संबंधित बसपुरवठादार व्यवसाय संस्थांकडून करण्यात येते.
सबब सदर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते तसेच अन्य सोयीसुविधा संबंधित व्यवसाय संस्थांच्या अखत्यारीतील असून या संस्थांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांना करारनाम्यात नमूद केल्याप्रमाणे किमान वेतन कायदा तसेच अन्य शासकीय कायद्यातील तरतुदींना अनुसरुन वेतन प्रदान करण्याच्या व अन्य सेवासुविधा पुरविण्याच्या सूचना बेस्ट प्रशासनाच्या वतीने देण्यात आल्या आहेत.
(३) बसपुरवठादार व्यवसाय संस्थांच्या अखत्यारीतील कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीसह अन्य सोयीसुविधांबाबतच्या मागण्यांवर तातडीने विचारविनिमय करण्याचे निर्देश संबंधित व्यवसाय संस्थांना देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई-विरार शहरात दळणवळणाची सुविधा अधिकच सुलभ होण्यासंदर्भात पाच ठिकाणी नवीन रेल्वे उड्डाण पूल बांधण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत

**(५०) ७५६०० (११-०२-२०२४). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.पालघर) शहरात दळणवळणाची सुविधा अधिकच सुलभ व्हावी यासाठी महानगरपालिकेने शहरात पूर्व व पश्चिमेला जे रस्ते जोडले जाऊ शकतात याबाबत सर्वेक्षण करुन पाच ठिकाणी नवीन रेल्वे उड्डाण पूल बांधण्याबाबतचा प्रस्ताव तयार करुन केंद्र शासनाच्या 'सेतू भारतम' या योजनेंतर्गत तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत निधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भातील प्रस्ताव माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यासुमारास शासनाकडे पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा कोणत्या पाच ठिकाणी सदरचे नवीन उड्डाण पूल बांधण्याचे प्रस्तावित केले आहे,

(३) असल्यास, सदरच्या उड्डाण पूलांसाठी किती खर्च येणार असून सदरच्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, सदरच्या उड्डाण पूलांचे बांधकामास कधी सुरुवात होणार असून ते पूर्ण होण्यास किती कालावधी लागणार आहे,

(५) असल्यास, उक्त काम शीघ्रगतीने करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०४-२०२४) :**(१) हे खरे नाही.

परंतु, वसई-विरार शहर महानगरपालिकेकडून यासंबंधीचा प्रस्ताव मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास प्राप्त झाला आहे.

(२) वसई-विरार शहर महानगरपालिकेकडून वसई-विरार शहरात दळणवळणाची सुविधा अधिकच सुलभ व्हावी यासाठी विराटनगर येथील रेल्वे ओव्हर ब्रिज, ओस्वाल नगरी रेल्वे ओव्हर ब्रिज, अलकापूरी येथे रेल्वे ओव्हर ब्रिज, उमेळमान गावासमोर नव्याने रेल्वे ओव्हर ब्रिज व वसई रोड येथील जुना रेल्वे ओव्हर ब्रिज निष्कासित करुन नव्याने रेल्वे ओव्हर ब्रिज बांधण्याचे प्रस्तावित आहे.

(३), (४), (५) व (६)

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रस्तावित प्रस्तावाच्या अनुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत पुढील बाबींची पूर्तता करण्याबाबत महानगरपालिकेस कळविले आहे.

१) स्थानिक स्वराज्य संस्थेच्या महासभेच्या ठरावाची प्रत.

२) अंदाजित ढोबळ किंमत, पुलांच्या लांबी व रुंदी.

३) ८०% जागा उपलब्धतेबाबतची ताबा पावतीसह प्रस्ताव.

४) बाधित असलेली अतिक्रमणाबाबतची सद्य:स्थिती.

५) वन जमीन व मिठागर जमीन या विभागांच्या परवानग्या.

६) तसेच सदर काम केंद्र/राज्य सरकारच्या योजनेअंतर्गत झालेले नसल्याचा दाखल्यासह प्रस्ताव.

महानगरपालिकेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणाकडील निधीच्या उपलब्धतेनुसार व अस्तित्वातील उर्वरित कामे यांचा सारासार विचार करुन सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत उचित निर्णय घेण्यात येईल.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री. जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.